
वर्ष : सोळावे
मार्च २०२४
अंक : तिसरा
मूल्य २० रुपये
पृष्ठसंख्या ५२

# राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

पाच वर्षांच्या मुलाच्या नजरेतून उलगडणारी ही कथा !
त्याच्या व त्याच्या आईच्या नजरकैदेची व्यथा आणि सुटकेची वास्तवकथा म्हणजे...



अभिनंदन!

# स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांचे ‘राजहंसी’ मानकरी





*प्रौढ वाङ्मय - ललितगद्य*

**अनंत काणेकर पुरस्कार**

अरुण खोपकर

प्राक् - सिनेमा






*प्रौढ वाङ्मय - ललितकला आस्वादपर लेखन*

**श्री. के. क्षीरसागर पुरस्कार**

सत्यशील देशपांडे

गान गुणगान






*प्रौढ वाङ्मय - भाषाशास्त्र*

**नरहर कुरुंदकर पुरस्कार**

डॉ. शैलजा बापट

॥ महानुभाव वाङ्मय ॥






*प्रौढ वाङ्मय - पर्यावरण*

**डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार**

अतुल देऊळगावकर

पृथ्वीचे आख्यान



ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी ‘राजहंस’ प्रकाशनाचे व्यासपीठ

*आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥*

**संत तुकाराम**

# राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
आरती घारे

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी

अक्षरजुळणी :
यशोधन लोवलेकर

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

मुखपृष्ठ-आतील मांडणी :
तृप्ती देशपांडे

वर्ष सोळावे :
अंक तिसरा
१५ मार्च २०२४
मूल्य : ₹ २०/-

अनुक्रम :


- संपादकीय / ५
- राजहंसी ग्रंथसृष्टी
  *वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत*
  – बाळकृष्ण कवठेकर / ९
- गाऊ त्यांना आरती
  *महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर :*
  *संघर्ष आणि समन्वय* / १९
- चित्र पाहीन आवडी : नितीन हडप / २५
- असे जन्मले पुस्तक!
  *काश्मिरियत* – सुप्रिया राज / २९
- आठवणींच्या खिडकीतून
  *सुबह-सुबह ‘उंबरठा’वर आदळलो...*
  – श्रीराम रानडे / ३१
- क... कवितेचा : योगिनी सातारकर-पांडे / ३५
- उद्‌गार
  *सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी*
  *: माधव गाडगीळ*
  – श्रीधर लोणी / ३७
- राजहंसी पार / ४१
- वाचकांच्या मनातलं... / ४३


या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९/२४४६५०६३.
E-mail : rajhansgranthvedh@gmail. com ● Website : www. rajhansprakashan. com

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके




संगमनेर येथील एक होतकरू तरुण, स्थापत्य अभियंता.
आपल्या अफाट कर्तृत्वाने मानवी अस्तित्वाशी सगळे एकेक
कडीने जोडतो, जणू जीवन फुलवणारे...

### पाषाणाचे पाझर

स्थापत्य अभियंत्याची कर्तृत्वगाथा

विवेक गाडगीळ

किंमत : ₹ ९५०/- । (ट. ख. ₹ १००)

मानवी भावभावनांची आणि पर्यायाने मानवी वर्तनाची
पाळेमुळे मेंदूत असली पाहिजेत,
या विज्ञानाच्या विचारधारेला बळकटी देणारे,
मेंदूविज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणारे

### आपले वर्तन ↔ आपला मेंदू

डॉ. आनंद जोशी / सुबोध जावडेकर

किंमत : ₹ ४४०/- । (ट.ख. ₹ ५०)







एका सर्वसामान्य माणसाचा अनघड प्रवास. अनेकांना
अडचणीतून मार्ग दाखवणारा, दिशाहीन वा नाउमेद
झालेल्या तरुणाईला दिलासा मिळेल
या विश्वासाने केलेला...

### फकिरी

एक अनघड प्रवास...

दत्ता बारगजे

किंमत : ₹ ३९५/- । (ट. ख. ₹ ५०)

# संपादकीय

*'राजहंस ग्रंथवेध' ही आमची गृहपत्रिका असली,*
*तरीही वाचकांना त्यातून नवीन माहिती द्यावी,*
*असा आमचा कायमच प्रयत्न असतो. त्यामुळेच या वेळी*
*'भारतरत्न' या सन्मानाविषयी विस्ताराने माहिती दिली.*

नमस्कार वाचकहो,

मध्यंतरी केंद्र सरकारकडून 'भारतरत्न' या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. हा पुरस्कार मिळालेल्या व्यक्तींची यादी बघितली. साहजिकच आणखी एका गोष्टीकडे लक्ष गेले, ती म्हणजे या यादीतील तब्बल सोळा व्यक्तींवर, त्यांच्या कार्यावर आम्ही पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांतील काही आत्मकथन स्वरूपात आहेत, काही चरित्र स्वरूपात आहेत. यात अनुवादित पुस्तकेही आहेत. या पुस्तकांतील काही चरित्रनायकांना हा पुरस्कार आम्ही पुस्तक प्रकाशित करण्याआधी, तर काहींना पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर मिळाला आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे : अटल बिहारी वाजपेयी *(अटलजी)*, लालकृष्ण अडवाणी *(देश माझा, मी देशाचा)*, इंदिरा गांधी *(इंदिरा गांधी, इंदिरा गांधी : एक वादळी पर्व, इंदिरा : अंतिम पर्व, पी. एन. हक्सर आणि इंदिरा गांधी : दोन आयुष्यांची गुंफण, दृष्टीआडच्या इंदिरा गांधी)*, पी. व्ही. नरसिंहराव *(रावपर्व)*, ए. पी. जे. अब्दुल कलाम *(अग्निपंख, ए. पी. जे. व्यक्तिवेध)*, जे. आर. डी. टाटा *(मी पाहिलेले जे. आर. डी.)*, पं. भीमसेन जोशी *(भीमसेन)*, सी. एन. आर. राव *(सी. एन. आर. राव)*, पं. जवाहरलाल नेहरू *(नेहरू)*, सत्यजित रे *(गगन समुद्री बिंबले)*, राजीव गांधी *(शोध राजीव हत्येचा, राजीव-सोनिया यांच्या सहवासात)*, डॉ. बाबासाहेब आंबेडकर *(महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय)*, नेल्सन मंडेला *(मंडेला)*, आचार्य विनोबा भावे *(विनोबा)*, मदर तेरेसा *(मदर तेरेसा)*, महर्षी धोंडो केशव कर्वे *(महर्षी ते गौरी)*. या अंकापासून आमच्या अशा पुस्तकांचा परिचय करून देणार आहोत. त्या अनुषंगाने सदर व्यक्तीच्या जीवनकार्याची आणि पुस्तकाची ओळख वाचकांना होईल.

अनेक पुरस्कारांबद्दल आपण वाचत असतो, ऐकत असतो; पण त्यांबद्दल सुव्यवस्थित माहिती नसते. अधिक चौकशी करता लक्षात आले की, बऱ्याच जणांना 'भारतरत्न' या प्रतिष्ठित पुरस्काराविषयी नेमकी माहिती नव्हती. त्यामुळे कुतूहल म्हणून आंतरजालात डोकावून बघितले आणि ती माहिती वाचकांसाठी सादर करावीशी वाटली.

'भारतरत्न' हा भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान आहे. साधारणपणे एका वर्षात तीन व्यक्तींना हा पुरस्कार देता येतो. पण प्रत्येक वर्षीच तो दिला जातो, असे नाही. आतापर्यंत ५३ व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. त्यात एकोणीस जणांना हा पुरस्कार मरणोत्तर दिला गेला आहे. दोन अभारतीय व्यक्तींनाही या सन्मानाने गौरवण्यात आले आहे. त्यांपैकी डॉ. नेल्सन मंडेला यांना वर्णभेदविरोधी चळवळीतील त्यांच्या भूमिकेसाठी, तर पाकिस्तानचे खान अब्दुल गफार खान यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कामगिरीसाठी हा सन्मान देण्यात आला आहे. या सन्मानासाठी जात, धर्म, शिक्षण, व्यवसाय, देश, भाषा, प्रांत अशी कुठलीच अट नसते. आपल्या देशासाठी अतिशय उत्तम म्हणजे सर्वोच्च प्रतीचे काम करणारी आणि आपल्या कामाद्वारे देशाची कीर्ती जगभर वाढवणारी व्यक्ती या पुरस्कारासाठी निवडली जाते; ज्या व्यक्तीकडून समाजाला, येणाऱ्या पिढ्यांना काहीतरी शिकता येईल, तिचा आदर्श ठेवता येईल. या व्यक्तीने आपले उभे आयुष्य अशा कामासाठी वाहून घेतलेले असते. काही वेळा वय लहान असले, तरी या व्यक्तीमुळे आपल्या देशाला जगभरात मान मिळालेला असतो, त्या व्यक्तीला या सन्मानाने गौरविले जाते. आपल्या सर्वांचा लाडका क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याचे उदाहरण आपल्यासमोर आहेच. सचिनला वयाच्या बेचाळिसाव्या वर्षीच हा सन्मान मिळाला आहे.

सेवा, कला, साहित्य, विज्ञान, विश्वशांती तसेच मानव विकास, कारखानदारी इत्यादी क्षेत्रांतील लोकांचा, सनदी क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचा व याव्यतिरिक्त दुसरे कोणतेही अतुलनीय काम करणाऱ्या व्यक्तींचाही 'भारतरत्न' पुरस्कार देऊन सन्मान करावा, असा निर्णय इ.स. १९५४मध्ये तत्कालीन भारत सरकारतर्फे घेण्यात आला. मरणोत्तर 'भारतरत्न' देण्यात यावा, असे १९५५ साली ठरले. २०१४मध्ये वरील क्षेत्रांबरोबरच क्रीडाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात यावा, असे ठरले.

भारत सरकारच्या राजपत्रात नमूद केलेल्या नियमांनुसार हा पुरस्कार देण्यात येतो. सर्वप्रथम १९५४ साली राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. चंद्रशेखर व्यंकट रमण, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेते आणि शेवटचे गव्हर्नर सी. राजगोपालाचारी आणि भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली

राधाकृष्णन या तिघांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. तर २०२४मध्ये कर्पुरी ठाकूर, लालकृष्ण अडवाणी, पी. व्ही. नरसिंहराव, एम. एस. स्वामिनाथन, चौधरी चरण सिंह यांना हा सन्मान जाहीर करण्यात आला.

'भारतरत्न' पुरस्काराचे स्वरूप म्हणजे यामध्ये एक पदक दिले जाते. पदकाच्या एका बाजूला पिंपळाच्या पानावर सूर्याची प्रतिमा असते, त्यावर देवनागरीत कोरलेला 'भारतरत्न' हा शब्द, तर उलट बाजूला भारताचे राजचिन्ह असते. राष्ट्रपतींच्या हस्ते हे पदक देण्यात येते. यात रोख रक्कम एकरकमी मिळत नाही, तर ती निवृत्तिवेतन या स्वरूपात मिळते. कुठलीही पदवी मिळत नाही. हा पुरस्कार ज्या व्यक्तींना मिळाला आहे, त्यांना नावाआधी 'भारतरत्न' हा शब्द उपाधीसारखा वापरायची परवानगी नाही. मात्र 'भारतरत्न' ज्यांना मिळतो, त्यांना सरकारकडून अनेक सुविधा मिळतात; जसे की, त्यांची श्रेणी 'व्हीव्हीआयपी'च्या समकक्ष असते. या व्यक्ती संसदेच्या बैठकांमध्ये व सत्रांमध्ये सहभागी होऊ शकतात. भारताचे राष्ट्रीय सण म्हणजे 'प्रजासत्ताक दिन' आणि 'स्वातंत्र्य दिन'. या दोन्ही दिवशी सन्माननीय अतिथी म्हणून त्यांना समारंभात आमंत्रित केले जाते. तसेच भारतामध्ये कुठेही जाण्यासाठी प्रथम श्रेणीचे मोफत विमान तिकीट व रेल्वे प्रवास तिकीट मिळते. आवश्यकता असेल, तर सर्वोच्च अशी 'झेड' श्रेणीची सुरक्षा पुरवली जाते. भारतीय राज्यघटनेनुसारच्या क्रमवारीत माजी पंतप्रधान, केंद्र सरकारमधील कॅबिनेट स्तराचे मंत्री, लोकसभा व राज्यसभेतील प्रमुख विरोधी पक्षनेता, भारतीय योजना आयोगाचे उपसभापती आणि राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या नंतरच्या सातव्या स्थानाच्या दर्जाचा सन्मान 'भारतरत्न' सन्मान मिळालेल्या व्यक्तीला दिलेला आहे.

वाचकहो, 'राजहंस ग्रंथवेध' ही आमची गृहपत्रिका असली, तरीही वाचकांना त्यातून नवीन माहिती द्यावी, असा आमचा कायमच प्रयत्न असतो. त्यामुळेच या वेळी 'भारतरत्न' या सन्मानाविषयी विस्ताराने माहिती दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १९९० साली 'भारतरत्न' (मरणोत्तर) प्रदान करण्यात आला. आंबेडकर यांनी समाजात समता यावी, यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याचा सन्मान करण्यासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या अंकात 'महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय' या पुस्तकाचा परिचय देऊन आम्ही 'गाऊ त्यांना आरती' या परिचयमालिकेचा आरंभ करत आहोत.

**आरती घारे**

कार्यकारी संपादक

## वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके





ज्येष्ठ चित्रकार मारुती पाटील यांनी जवळजवळ चार दशके अध्यापनाबरोबरच स्वत: चित्रनिर्मिती केली. त्यांच्या कलाप्रवासाचे अनुभव व त्यांची काही चित्रे या पुस्तकातून बघायला मिळतील. मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमध्ये उपलब्ध.

### रंग रेषांचे सोबती

मारुती पाटील

पुठ्ठा बांधणी किंमत : ₹ ३५००/- । (ट. ख. ₹ १००)
साधी बांधणी किंमत : ₹ १४००/- । (ट. ख. ₹ १००)

कशी होती सीता? विचारी आणि खंबीर? की हतबल आणि भावुक? महर्षी वाल्मिकींनी चितारलेल्या सीतेच्या विविध प्रतिमांचा समृद्ध वेध घेणारी कादंबरी...




### सीता

अभिराम भडकमकर

किंमत : ₹ ३७५/- । (ट. ख. ₹ ५०)




बेर्डेंमधला लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी. कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

### हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंसी ग्रंथसृष्टी

# वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत

*'वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत' हे पुस्तक 'राजहंस'ने नुकतेच प्रकाशित केले. पुस्तक परिचय म्हणून त्यातील 'मराठी नवकथेच्या जडणघडणीत 'सत्यकथे'चे योगदान' या प्रकरणाचा हा संपादित अंश.*

मराठीत जिला 'नवकथा' असे म्हटले जाते, तिचे लेखन नेमके कधीपासून सुरू झाले? या प्रश्नाचे उत्तर कालदृष्ट्या देण्याऐवजी लेखनदृष्ट्या देणे अधिक योग्य होईल. म्हणजे असे की, मराठी नवकथेचा आरंभ १९३९ / ४० सालापासून झाला, असे लिहिण्याऐवजी गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर यांच्या कथालेखनापासून मराठी नवकथालेखनाचा प्रारंभ झाला, असे लिहिणे अधिक योग्य होईल. या चौघांच्या कथा वाचताना जाणत्या वाचकांना हे जाणवू लागले की, आपण आजवर वाचत आलेल्या फडके, खांडेकर आदी लेखकांच्या कथेपेक्षा वेगळे काहीतरी असणारी कथा वाचत आहोत. हे वेगळेपण केवळ बाह्य स्वरूपाचेच आहे, असे नव्हे, तसे ते तर आहेच; पण तिचे अंतरंग, तिच्यातून प्रकट होणारे अनुभवचित्रही वेगळे आहे.

वा. ल. आणि गाडगीळ यांनी मराठी नवकथेच्या स्वरूप व सामर्थ्य याविषयी केलेले लेखन सामान्यत: सर्वमान्य झालेले आहे आणि त्यांचा सर्व बाजूंनी विचार करता असे लक्षात येते की, 'सत्यकथे'ने तिच्या प्रकृतीप्रमाणे मराठी साहित्यातील 'चांगल्या नवीनते'चाही स्वागतशील पुरस्कारच केलेला आहे. त्यामुळेच मराठी नवकथेची समर्थ वैशिष्ट्ये तिला प्राप्त करून देण्यात सत्यकथेचा आणि तिचे प्रदीर्घ काळ संपादन करणारे श्री. पु. भागवत यांचा मोठाच वाटा आहे.

१९३३ ते १९८२ या जवळपास अर्धशतकाच्या प्रदीर्घ काळात सत्यकथेच्या प्रत्येक अंकात कमीत कमी ३ व जास्तीत जास्त १५ कथा प्रसिद्ध केल्या आहेत. काही काळ तर 'सत्यकथा' वर्षारंभ अंक हा 'कथाविशेषांक' म्हणून काढत असे. सरासरी प्रत्येक अंकात ५ कथा धरल्या, तर प्रतिवर्षी ६० कथा सत्यकथेने प्रसिद्ध केल्या व ५० वर्षांत ३००० कथा सत्यकथेने प्रसिद्ध केल्या असे दिसते. सत्यकथेने स्वतंत्रपणे लिहिलेल्या कथा तर प्रसिद्ध केल्याच, पण त्याबरोबरच अन्य भाषांमधून अनुवादित करण्यात आलेल्या कथाही प्रसिद्ध केल्या आहेत. याहीपुढे जाऊन प्रसिद्ध

आणि प्रतिष्ठित महाविद्यालयांच्या वार्षिक अंकांतील दर्जेदार कथांचा शोध घेऊन त्यांना सत्यकथेत स्थान दिले आहे.

याचे आणखी एक उदाहरण म्हणजे, वर उल्लेख केलेल्या कथाकारांच्या कथालेखनाविषयी समकालीन कथाकारांकडून किंवा समीक्षकांकडून समीक्षालेखन करून घेऊन ते सत्यकथेत प्रकाशित केले जात असे. यात संबंधित लेखकाच्या सामर्थ्याबरोबरच त्याच्या मर्यादाही दाखवल्या जात. गाडगीळ, वा.ल., रा. भि. जोशी यांनी असे लेखन केल्याचे दिसते. विशेष म्हणजे मर्यादा दाखवल्याबद्दल संबंधित लेखकाने किमान जाहीरपणे तरी नाराजी दाखवल्याचे दिसत नाही. असे मोकळेपणा असणारे वाङ्मयीन वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सत्यकथेने, तिच्या संपादकांनी सुजाणपणे केला, याचीही दखल घ्यावी लागते. नवकथेचा प्रभाव या काळात इतका होता की, पुढील काळात समीक्षक, चरित्रकार म्हणून नावारूपाला आलेले म. द. हातकणंगलेकर, अ. के. भागवत यांनीदेखील सत्यकथेत एखाद्दुसरी कथा लिहिलेली आहे. गाडगीळ, गोखले, माडगूळकर, भावे या चार कथाकारांना नवकथेचे प्रवर्तक मानले जाते. आणि ते योग्यही आहे. पण हे चारही कथाकार 'सत्यकथेने' घडवले असे म्हणणे पूर्णपणे योग्य होणार नाही. पण त्यांच्या कथालेखनाला आत्मीयतेने प्रकाशित करणे, त्यातून प्रकट होणाऱ्या नवीन वैशिष्ट्यांचा पुरस्कार करणे, त्यांच्या वाङ्मयीन दृष्टिकोनाला पाठबळ देणे, चित्रणातून प्रकट होणाऱ्या वैशिष्ट्यांना नवकथेचे वाङ्मयीन विशेष म्हणून मान्यता मिळवून देणे ही आणि यासारखी तत्कालीन साहित्यसृष्टीत महत्त्वाची कार्ये सत्यकथेने केली, हे मान्य करावे लागते.

गाडगीळ आणि गोखले इ. कथाकारांसंबंधी विवेचन करण्यापूर्वी एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. तो असा की, १९२५ ते १९३५ या दशकात दोन पाश्चिमात्य





श्री. पु. भागवतांच्या नेतृत्वाखाली 'मौज' साप्ताहिक, 'सत्यकथा' मासिक आणि 'मौज प्रकाशनगृह' यांनी वाङ्मय आणि कला या क्षेत्रांत केलेल्या कार्याचे व श्री.पुं.नी या तिन्ही विभागांत केलेल्या संपादनाचे स्वरूप वस्तुनिष्ठ भूमिकेतून तपासण्याचा प्रांजळ प्रयत्न.

वाङ्मयीन युगान्तर आणि श्री. पु. भागवत

संपादक : सुधीर रसाळ, वसंत पाटणकर

किंमत : ₹ ६००/- । (ट. ख. ₹ ६०)


विचारवंतांचा प्रभाव भारतीय विचारविश्वावर पडला. ते दोन विचारवंत म्हणजे कार्ल मार्क्स व सिग्मंड फ्रॉइड हे होत. मार्क्सने अर्थाधिष्ठित समाजरचनेचा सिद्धांत मांडला. त्याच्या आधारे त्याने समग्र जीवनाला कवेत घेणारे तत्त्वज्ञान मांडले. तर फ्रॉइड या मानसशास्त्रज्ञाने मानवी जीवनातील कामभावनेचे मूलभूत स्थान स्पष्ट करणारा सिद्धांत मांडला. मराठीतील नवकथाकारांवर फ्रॉइडच्या मांडणीचा अधिक प्रभाव पडला. फ्रॉइडने मांडलेल्या मनोविश्लेषणपद्धतीचा तर मराठी नवकथाकारांनी अगदी यथावत स्वीकार केला. याचा परिणाम मराठी नवकथेच्या स्वरूपावर मोठ्या प्रमाणात झाला. मराठी नवकथाकारांबरोबरच नवकथेला प्रसिद्धी देऊन तिची सातत्याने पाठराखण करणारे सत्यकथेचे संपादक श्री. पु. भागवत यांच्यावरदेखील फ्रॉइडचा मोठाच प्रभाव पडला, हेही नमूद केले पाहिजे. त्याबरोबरच हेही सांगितले पाहिजे की, हा प्रभाव फ्रॉइडने व्यक्तिमनाविषयी केलेल्या मांडणीपुरताच फक्त मर्यादित होता. फ्रॉइडच्या सामाजिक मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र इत्यादींचा प्रभाव नवकथाकार व त्यांचे पुरस्कर्ते यांनी स्वीकारला नाही. वर म्हटल्याप्रमाणे गाडगीळ यांच्या जडणघडणीत सत्यकथेचा वाटा त्यांचे लेखन आवर्जून प्रकाशित करण्यापुरताच आहे. सत्यकथेने त्यांच्या कथा आणि समीक्षालेखन प्राधान्याने प्रसिद्ध केले. 'कडु आणि गोड' या त्यांच्या पहिल्या कथेपासूनच त्यांचे वेगळेपण लक्षात येऊ लागले. व्यक्तिमन आणि जीवन यासंदर्भातील कोणताही अनुभव वर्ज्य न मानता गाडगीळ यांनी कथालेखन केले. व्यक्तीच्या मनाचे कुरूप, किरटे, किडलेले, थकलेभागलेले, अभद्र असे स्वरूप जसे त्यांनी साकार केले; तसेच त्याचे सुंदर, उदार, उदात्त, उत्साही स्वरूप त्यांनी आपल्या कथालेखनातून साकार केले. 'किडलेली माणसे', 'भागलेला चांदोबा', 'तलावातले चांदणे'


रसाळांना जशी माणसे आठवतात, गावे आठवतात;
तसा तो काळही आणि त्यावेळची संस्कृतीही आठवते.
ही व्यक्तिचित्रे जशी काही गावांची आणि
काही माणसांची आहेत, तशीच
ती एका मावळलेल्या संस्कृतीचीही आहेत.
– नरेन्द्र चपळगावकर

माणसं जिव्हाळ्याची

सुधीर रसाळ

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



यांसारख्या कथा या वैशिष्ट्यांनी युक्त अशाच कथा होत.

अरविंद गोखले हे गाडगीळ यांच्या बरोबरीने लेखन करणारे कथाकार. वा. ल. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्याकडे असणाऱ्या परमनप्रवेशाच्या शक्तीमुळे त्यांना चित्रणविषय झालेल्या व्यक्ती आणि घटना-प्रसंग यांचे उत्तमपणे चित्र साकारता येते. गोखले यांची कथा बहुतेक वेळा कथन-निवेदन यांतून आकाराला येते. या कथन-निवेदनाला इतके महत्त्व दिले जाते की, कथाविषय त्याने झाकोळून जातो. अशा वेळी गोखले यांच्या कथेतील नवता बाधित होते. म्हणून तिचा एक पाय जुन्या कथेतच रेंगाळत राहिला आहे, असे म्हणावेसे वाटते. पण त्याबरोबरच गोखले अत्यंत निष्ठापूर्वक केवळ कथाच लिहीत राहिले. अन्य कोणताही वाङ्मयप्रकार त्यांना हाताळावासा वाटला नाही. हे त्यांचे वेगळेपणही लक्षात घेतले पाहिजे, असे वाटते. प्रामुख्याने व्यक्तिमनाच्या भावभावना, विचार, आचार, वागणे-बोलणे यांचे चित्रण करताना गोखले यांनी काही कथांमधून सामाजिक संबंधांचे चित्रण केले; तर नवकथेचा पुरस्कार करणारे समीक्षक वा. ल. कुलकर्णी यांनी त्यांना 'गोखले यांनी समाजमनाचे चित्रण करण्याऐवजी व्यक्तिमनाचे पदर उलगडण्याला अधिक महत्त्व द्यावे.' असा सल्ला दिला, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

पु. भा. भावे यांचे कथालेखन दीर्घकाळ नवकथा समृद्ध करणारे ठरले. प्रेमाची सफलता-विफलता यापासून ते मुक्तीसारख्या तत्त्वचिंतनात्मक विषयापर्यंत असा व्यापक आटोप असणारे कथालेखन भावे यांनी केले आहे. एखाद्या प्रपाताप्रमाणे अनुभव आवेगाने भावे यांच्या कथेतून आविष्कृत होतो. प्रेम, भूक, पौगंडावस्थेतील तरुण मनात निर्माण होणारी कामभावना यांचे चित्रण करणारे कथालेखन भावे यांनी केले. त्यांचे भाषावैभव हे त्यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. गाडगीळ, गोखले, भावे हे तीनही नवकथाकार एकापरीने स्वयंभू लेखक आहेत, असे म्हणावे लागते. श्री.पुं.नी त्यांच्या लेखनाला आवर्जून, आग्रहाने सत्यकथेत स्थान दिले; हेच सत्यकथेचे या तिघांच्या कथेच्या जडणघडणीतील योगदान आहे, असे म्हणता येईल. व्यंकटेश माडगूळकर यांचे कथालेखन प्रामुख्याने व्यक्तिचित्रणात्मक स्वरूपाचे आहे. 'माणदेशी माणसे' या पहिल्याच लेखनापासून हे स्पष्ट झाले आहे. शेती आणि तिच्याशी निगडित असणाऱ्या व्यवसायातील माणसे माडगूळकर यांच्या कथालेखनाचा विषय झालेली आहेत. माणदेशी मातीचा अस्सल गंध या व्यक्तींच्या कृतिउक्तींना लाभलेला असल्यामुळेच त्या अस्सल, जिवंत वाटतात. दुष्काळ, दुर्भिक्ष, दारिद्र्य यांत ही माणसे सतत गांजून गेलेली दिसतात. पण त्यांची जगण्याची इच्छा संपत नाही. एखादा रामा मैलकुली 'देवा चांडाळा' असे म्हणत देवाला व्याकूळपणे प्रश्न विचारतो. पण एरवी ही सगळी माणसे वाट्याला आलेले जीवन 'आहे त्यात समाधान मानत' जगत राहतात. अनुभवातून साकार होणाऱ्या या कथालेखनात श्री.पुं.शी झालेल्या चर्चा, इंग्रजी साहित्याचे वाचन आणि

गाडगीळ यांच्या कथेचा परिणाम या सर्व बाबींमुळे माडगूळकरांचे कथालेखन विकसित झाले आहे. त्यांनी अनुभवलेला गावगाडा, त्यात होत गेलेला बदल यांचे चित्रण माडगूळकरांनी प्रत्ययकारीपणे केले आहे. ते करताना त्यांच्याबरोबर येणारे समाजजीवनही माडगूळकर यांच्या कथालेखनातून आविष्कृत झाले आहे. लेखनातील प्रांजळपणा हा माडगूळकर यांचा महत्त्वाचा विशेष आहे. त्यांच्या सहज सुंदर भाषेचाही अवश्य उल्लेख केला पाहिजे.

१९६०च्या नंतर ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे कथालेखनही केले जाऊ लागले. शंकर पाटील, द. मा. मिरासदार; पुढील काळात आनंद यादव, रा. रं. बोराडे, सखा कलाल यांच्यासारखे नव्या दमाचे कथाकार ग्रामीण जीवनाचे विविधरंगी चित्रण करणाऱ्या कथा-कादंबऱ्या लिहीत होते. सत्यकथेने हे लेखन जाणीवपूर्वक प्रसिद्ध केले. वेगळे अनुभवचित्रण करणारे कथालेखन म्हणून सत्यकथेने त्यांना स्थान दिले असे म्हणता येणार नाही. भागवत यांच्या कलात्मकतेच्या कसोटीवर ते उतरत होते म्हणून, आणि उतरत नसते तर तसे होईल असे पुनर्लेखन करायला लावून ते सत्यकथेत प्रकाशित केले. म्हणून सत्यकथेने प्रकाशित केलेल्या ग्रामीण कथांमधून ग्रामीण व्यक्ती आणि त्यांच्या भावजीवनाचे चित्रण येते; पण ग्रामीण समाजजीवन, ग्रामीण संस्कृती यांचे चित्रण मात्र येत नाही. आपापतः येईल, एवढेच त्यांचे चित्रण येते. व्यक्तीचे भावजीवन, त्यातील विविध ताणतणाव यांचे विविधांगी चित्रण हेच सत्यकथेतील सर्व प्रकारच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य ठरते.

ज्यांच्या जडणघडणीत सत्यकथेचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे, असे म्हणता येईल असे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणजे शंकर पाटील हे होत. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य आणि स्त्रियांची दुःखे शंकर पाटील यांनी आपल्या कथेत प्रामुख्याने चित्रित


अभिनंदन!

लोकमत साहित्य पुरस्कार २०२४



बालसाहित्य
पुरस्कार

किमयागार कार्व्हर

वीणा गवाणकर



केली आहेत. ‘वेणा’, ‘भुजंग’ या आणि अशा अनेक कथांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. ‘वळीव’सारख्या कथेत काढून ठेवलेली तंबाखू अवकाळी पावसामुळे भिजून जाईल यामुळे भीतिग्रस्त झालेल्या शेतकऱ्याच्या मन:स्थितीचे चित्रण शंकर पाटील यांची कथा अत्यंत प्रभावीपणे करते. राजाराम कॉलेजचे विद्यार्थी असताना ‘राजारामीय’ या कॉलेजच्या वार्षिकात छापून आलेली पाटलांची कथा सत्यकथेने आवर्जून पुन: प्रकाशित केली. आनंद यादव आणि रा. रं. बोराडे या दोन नामवंत कथाकारांच्याही कथा सत्यकथेने संस्कारित करून प्रसिद्ध केल्या. ‘खळाळ’ हा यादवांचा आणि ‘मळणी’ हा बोराडे यांचा कथासंग्रह ‘मौज’ प्रकाशनाने एकाच वेळी प्रकाशित केला, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. ग्रामीण कथालेखनाला सत्यकथेने मोठे प्रोत्साहन दिले, हे मान्य करावे लागते. १९६५ नंतर ग्रामीण साहित्यिकांच्या बरोबरच दलित साहित्यिकही त्यांचे जीवनानुभव चित्रित करणारे साहित्य निर्माण करू लागले. बाबूराव बागुल यांच्यासारखे कथाकार आतापर्यंत मराठीत न आलेले जीवनानुभव कथेतून मांडू लागले. नकार आणि विद्रोह यांनी युक्त अशी सामाजिक जाणीव प्रकट करणारे अर्जुन डांगळे, वाघमारे असे लक्षणीय कथालेखन करणारे दलित साहित्यिक पुढे आले. सत्यकथेने त्यांपैकी फक्त बाबूराव बागुल यांची एक कथा ‘आई’ ही प्रकाशित केली. मराठीत एक वेगळा साहित्यप्रवाह निर्माण होत होता, पण सत्यकथेने त्याची दखलही घेतली नाही, याचे आश्चर्य वाटते.

सत्यकथेने नाव मिळवून दिले असा ज्यांचा सार्थपणे उल्लेख करता येईल, असे चार महत्त्वाचे लेखक म्हणजे श्री. दा. पानवलकर, शरच्चंद्र वासुदेव चिरमुले, द. मा. मिरासदार आणि विद्याधर पुंडलीक. यांच्याबरोबरीने राजेंद्र बनहट्टी यांचाही उल्लेख करता येईल. या सर्वांचे लेखन चांगले, वैशिष्ट्यपूर्ण असले; तरी सत्यकथेने,





मराठवाड्यात जन्मलेल्या, लहानाचा मोठा झालेल्या एका संवेदनशील वाङ्मय-अभ्यासकाची ही कहाणी. त्याची एकट्याची नाही, तर मराठवाड्याची अन् तिथल्या माणसांची कहाणी. लेखकाच्या निमित्तानं साकारलेली त्याच्या जगाची ही कहाणी.

**लोभस**

**एक गाव - काही माणसं**

सुधीर रसाळ

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)

म्हणजेच श्री. पु. भागवत यांनी प्रचलित केलेल्या वाङ्मयीन अभिरुचीच्या चौकटीत बसणारेच होते असेच म्हणता येईल. पानवलकर हे कस्टम्समध्ये अधिकारी होते. नोकरीच्या काळात त्यांना जे वेगवेगळे अनुभव आले, ते त्यांच्या कथालेखनातून साकार झाले आहेत. हे सगळे त्यांच्या भाषेत साकार केल्यामुळे पानवलकर यांच्या कथेची भाषाही रांगडीच झालेली आहे. हे सगळे मान्य करूनही पानवलकर यांची 'वेगळी' कथा सत्यकथेच्या मूल्यचौकटीत बसणारीच झालेली आहे. हे सत्यकथेचे योगदान म्हणायचे की तिने घातलेली मर्यादा म्हणायचे, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे! यासंदर्भात सत्यकथेने 'सेक्स' आणि माणसांचे 'सेक्शुअल बिहेवियर' याकडे न-नैतिक दृष्टीने पाहण्याची क्षमता नवकथाकारांना दिली - हे तिचे म्हणजेच श्री. पु. यांचे मराठी नवकथेला दिलेले मोठेच योगदान आहे, हे नमूद केले पाहिजे. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्या 'शिकार' या होमोसेक्शुअल बॅरिस्टरच्या लैंगिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथेचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. सत्यकथेमुळे नवकथाकार सेक्सकडे धीटपणे पाहू लागले, चित्रण करू लागले. साहित्यकृती ही नीत्यातीत कलाकृती असते, ही जाणीव नवकथाकारांमध्ये रुजवण्याचे श्रेय सत्यकथेलाच दिले पाहिजे. ज्ञानेश्वर नाडकर्णी हा धूमकेतूसारखा अचानक उगवून 'आम्हा हेचि भांडवल', 'मोडून पडलेली मोटार' यासारख्या उत्तम प्रतीच्या कथा लिहून जातो, हे श्रेयही सत्यकथेचेच हे नमूद केले पाहिजे.

विद्याधर पुंडलीक हे तर बहुतांशी सत्यकथेनेच घडवलेले कथाकार होत, असे म्हणणे वास्तवाला धरूनच होईल. सत्यकथा किंवा मौज (दिवाळी अंक) यांतूनच त्यांच्या कथालेखनाचे विशेष लक्षात येतील. 'सती' ही त्यांची चांगली आणि गाजलेली कथा म्हणजे मराठी नवकथेला त्यांनी दिलेली एक मोठीच देणगी होय. व्यक्तिमनाच्या


अभिनंदन!


लोकमत साहित्य पुरस्कार २०२४



वैशिष्ट्यपूर्ण साहित्य पुरस्कार

माणूस 'असा' का वागतो?

अंजली चिपलकट्टी



विविध परींचे घडवलेले रेखीव चित्रण हे त्यांच्या कथेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य होय. मर्यादित अनुभवविश्वातून चांगले कथालेखन कसे होऊ शकते, याचे पुंडलीक यांचे कथालेखन हे उत्तम उदाहरण होय. चिरमुले यांचे कथालेखनही सत्यकथेच्या कथाविषयक मूल्यचौकटीत उत्तमपणे बसणारे, तरीही काही एक वेगळेपण प्रकट करणारे कथालेखन होय. हा वेगळेपणा अनुभववैविध्यातून जसा आलेला आहे, तसाच तो चिरमुले यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही पैलूंतूनही आलेला आहे. 'मारवा' ही त्यांची कथा हे त्याचे उत्तम उदाहरण होय. चिरमुले यांचा चित्रणविषयही मध्यमवर्ग हाच आहे. पण तो आर्थिकदृष्ट्या सुस्थितीतला आहे. तो कलाप्रेमी आणि आपल्या आवडीप्रमाणे जगणारा आहे. आपल्या मस्तीत जगतानाही आपल्या कुटुंबाविषयी त्याला आस्था आहे. अशा माणसांचे चित्रण चिरमुले यांच्या कथेला वेगळेपण प्राप्त करून देते. नवकथेचे सामर्थ्य पचवून तिच्याच वाटेने पुढे जाणारे कथाकार असे चिरमुले यांचे वर्णन करता येईल. अगदी असेच वर्णन राजेंद्र बनहट्टी यांचेही करावे लागेल.

जी. ए. कुलकर्णी हेही गाडगीळ यांच्याप्रमाणे स्वयंभू कथाकार आहेत, असे म्हणता येईल. त्यांच्यावर भागवत किंवा सत्यकथा यांचे संस्कार झालेले आहेत असे म्हणता येणार नाही, हे खरे. पण 'हिरवे रावे' व 'निळासावळा' या दोन संग्रहांतील कथा सत्यकथेच्या कथाविषयक मूल्यदृष्टीशी काही प्रमाणात नाते सांगणाऱ्या आहेत, हे नाकारता येणार नाही. 'माणूस नावाचा बेटा' ही कथा याचे उदाहरण म्हणता येईल. पण नंतरचे जी.ए. पूर्णपणे वेगळे आहेत. सत्यकथेने संस्कारित केलेली नवकथा आली नसती, तर जी.एं.ची कथा आली असती का, हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

सत्यकथेने पन्नास वर्षांच्या दीर्घ काळात अनेक लेखिकांना स्थान दिल्याचे दिसून येईल. ऊर्मिला सिरूर, तारा वनारसे, विजया राजाध्यक्ष, सुधा नरवणे, सरिता पदकी, आणि महत्त्वाच्या म्हणजे आशा बगे, गौरी देशपांडे यांच्या कथा सत्यकथेत प्रकाशित झाल्या आहेत. आशा बगे, गौरी देशपांडे या दोघी वगळता इतरांचे कथालेखन अत्यंत सुमार दर्जाचे झालेले आहे. अत्यंत मामुली कथावस्तू घेऊन ती उबवून लिहिलेल्या कथा असे त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप झालेले आहे. उदाहरणार्थ, सत्यकथेच्या फेब्रुवारी १९५७च्या अंकातील 'उत्तररात्र' ही कथा पतिपत्नीसंबंधांविषयीची, त्यातील पत्नीच्या अतृप्ततेचे चित्रण करणारी ही कथा इतकी भावुकपणे लिहिली जाते की, तिची अतृप्ती जाणवण्याऐवजी तिच्या अतृप्तीचा उबग येऊ लागतो. या लेखिकांच्या कथांविषयी लिहिताना 'सत्यकथेने अलीकडे धपापणाऱ्या उरांच्या लेखिकांचा एक वर्गच निर्माण केला आहे.' असे कडक टीका करणारे विधान केले होते ते योग्यच होते, असेच या लेखिकांचे कथालेखन आहे. या कथा 'सत्यकथेने' कशा प्रकाशित केल्या, असा प्रश्न पडतो.

आशा बगे यांच्या कथा मात्र त्यांचा समृद्ध व संपन्न आशय आणि त्याला लाभलेली तितकीच सशक्त अभिव्यक्ती यामुळे उत्तम प्रतीच्या झाल्या आहेत, हे नमूद करावे लागते. 'रुक्मिणी', 'मारवा', 'अत्तर', 'रंग' यांसारख्या काही कथांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. सत्यकथेने मराठी कथासृष्टीला दिलेली उत्तम कथालेखिका असे त्यांचे वर्णन यथार्थपणे करता येईल. मराठी नवकथेच्या जडणघडणीतील सत्यकथेच्या, श्री.पुं.च्या योगदानाचा असा आढावा घेतल्यानंतर लक्षात येते की, १९४० ते १९६५ या पाव शतकातील नवकथेवर सत्यकथेच्या कथाविषयक मूल्यदृष्टीचा प्रभाव खोलवर पडलेला आहे. व्यक्तिकेंद्री जीवनदर्शन, व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्मातिसूक्ष्म पदर उलगडणे, सेक्स आणि सेक्शुअल बिहेवियर यांच्याकडे धीटपणे पाहून त्याचे तितक्याच धीटपणे चित्रण करणे, साहित्यकृती ही न-नैतिक असते ही भूमिका रुजवणे, कथेच्या आकृतिबंधाविषयी दक्ष राहणे, स्त्रीपुरुष संबंधांच्या विविध छटा उलगडून दाखवणे, ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथालेखनाला प्रोत्साहन देणे, कथेत अनुभवांची विविधता आणण्याला महत्त्व देणे; मुख्य म्हणजे मानवी मन आणि जीवन कोणत्याही आडाख्यात, तर्काच्या चौकटीत बसणारे नसते ही जाणीव कथालेखनातून प्रकट होईल अशा कथा प्रकाशित करणे - हे सत्यकथा आणि तिचे संपादक श्री. पु. भागवत यांचे मराठी नवकथेला दिलेले योगदान आहे.

त्याबरोबरच या मूल्यदृष्टीमुळे नवकथेला पडलेल्या मर्यादांचीही नोंद करणे योग्य ठरेल. व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवताना ती समाजाचा घटक असते, त्या समाजाचे काही संकेत, रीतीरिवाज असतात, या सर्वांचे त्या व्यक्तीवर स्वाभाविकपणे, तिचे मन आणि वर्तन नियंत्रित करणारे संस्कार झालेले असतात; हे भान कथालेखनातून प्रकट न होणे ही मर्यादा नवकथेला पडली. सामाजिक जाणिवेचा अभाव असे तिला


अभिनंदन!

प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठान,
नांदेड



मातृश्री पद्मिनीबाई बन
साधना सन्मान पुरस्कार

◆

अभय बंग

म्हणता येईल. परिणमत: जात आणि जातीयवाद हे आपल्या सामाजिक जीवनाचे अविभाज्य घटक असूनही त्यांचे थोडेही दर्शन, अगदी ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथांमधूनही घडताना दिसत नाही. दारिद्र्याचे चित्रण येते, पण ते ज्या कारणांमुळे येते त्या कारणांचा शोध घेऊन त्यांचे चित्रण केले जात नाही. शोषितांचे चित्रण येते, पण शोषणाचे चित्रण मात्र येत नाही. नवकथेच्या काळातच किती तरी महत्त्वाच्या घटना घडल्या. स्वातंत्र्य प्राप्त झाले, महात्मा गांधींची हत्या झाली. त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रात जाळपोळीचा आगडोंब उसळला, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाले, जिल्हापरिषदांमुळे ग्रामीण भाग राजकारणग्रस्त झाला या आणि यासारख्या सामाजिक, राजकीय घडामोडींचे किंचितसेही भान नवकथेतून प्रकट होत नाही, हाही भागवत यांच्या कथाविषयक मूल्यदृष्टीचाच, अप्रत्यक्षपणे झालेला परिणाम होय. हमीद दलवाई यांच्यासारखे महत्त्वाचे कथाकार याला काही प्रमाणात महत्त्वाचे अपवाद ठरतात. 'कफनचोर', 'जमीला जावेद' यांसारख्या त्यांच्या कथा आणि 'इंधन'सारखी लघुकादंबरी मराठी मुस्लीम समाजाचे जीवन चित्रित करणारी आहे. दारिद्र्य, अशिक्षितपणा, धर्माने घातलेली बंधने पटत नसतानाही नाइलाजाने पत्करण्याची मनोवृत्ती अशा अनेक वैशिष्ट्यांनी युक्त अशा मुस्लीम स्त्रीपुरुषांचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा उल्लेखनीय आहेत. आनंद विनायक जातेगावकर यांच्या कथांचाही आवर्जून उल्लेख करावा अशा त्या आहेत. 'मुखवटे' या संग्रहातील त्यांच्या कथा प्रामुख्याने सत्यकथेत प्रकाशित झालेल्या आहेत. त्यातील 'मुखवटे' या कथेत महालक्ष्म्यांच्या सणाच्या वातावरणाचे एका कुटुंबाच्या माध्यमातून चित्रण करण्यात आले आहे. सत्यकथेने मराठी कथेला दिलेले उत्तम कथाकार असा दलवाई आणि जातेगावकर यांचा उल्लेख करणे रास्तच ठरेल.

सत्यकथेत कथा छापून येणे हे त्या काळात प्रतिष्ठेचे, कथाकार म्हणून मान्यता मिळाल्याचे द्योतक मानले जात असे. साहजिकच लेखक कळत नकळत सत्यकथेच्या मूल्यचौकटीत बसेल अशा विषयांवरच, त्याच दृष्टिकोनातूनच कथा लिहीत असत. व्यक्तिमनाच्या नाना परी, त्या / त्यांचे भावबंध यांना प्राधान्य देणारा आशय असणारी कथा लिहिण्याकडे लेखकांचा कल होईल असेच वाङ्मयीन वातावरण त्यामुळे मराठी साहित्यसृष्टीत त्यामुळे निर्माण झाले. त्यामुळेच वर उल्लेख केलेल्या महत्त्वाच्या सामाजिक, राजकीय घडामोडी या कथाविषय होऊ शकल्या नाहीत. लेखकांना तशा त्या कराव्याशा वाटल्या नाहीत, हे नमूद करावे लागते. सत्यकथा व श्री. पु. भागवत यांच्या मूल्यदृष्टीमुळे मराठी नवकथेला जसे वैशिष्ट्यपूर्ण सामर्थ्य प्राप्त झाले, तसेच तिचा आशय संकोच करणाऱ्या मर्यादाही पडल्या. हेच सत्यकथा आणि श्री. पु. भागवत यांच्या कार्याविषयी म्हणावे लागेल.

**बाळकृष्ण कवठेकर**

# गाऊ त्यांना आरती

'भारतरत्न' हा सर्वोच्च
नागरी सन्मान मिळवलेल्या
कर्तृत्ववंतांची 'राजहंसी' चरित्रे

## महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १९९० साली 'भारतरत्न' (मरणोत्तर) या सर्वोच्च नागरिक सन्मानाने गौरवण्यात आले. 'महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर : संघर्ष आणि समन्वय' हे नामदेव कांबळे लिखित पुस्तक 'राजहंस'ने प्रकाशित केले. त्यातील 'अस्पृश्यतानिर्मूलन : दृष्टी आणि दृष्टिकोन' या प्रकरणातील हा संपादित अंश.*

**आंबेडकरांचे स्वानुभवातून स्फुरलेले कार्य**

अस्पृश्य जातीत जन्माला आल्याने डॉ. आंबेडकरांना कटू अनुभव आले होते. त्याची गडद छाया त्यांच्या अस्पृश्यतानिर्मूलन कार्यावर पडली. त्यांच्या कार्याची काही ठळक वैशिष्ट्ये सांगता येतात. ती अशी - १) हिंदू धर्माच्या मर्यादेत राहून त्यांनी अस्पृश्यतानिर्मूलनाचा जोरकस प्रयत्न केला. २) अस्पृश्य समाजाला उद्देशून काही लेखन व भाषणे केली. ३) अस्पृश्यांच्या संघटना बांधून त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. ४) ब्रिटिश शासनाशी संपर्क साधून अस्पृश्यांच्या मागण्या त्यांच्या पुढ्यात ठेवल्या.

आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी सत्याग्रह केले. अनेक वेळा हिंदूंना आवाहन केले. हिंदू धर्मसुधारकांच्या कार्याच्या मर्यादा अधोरेखित केल्या. गांधी व काँग्रेसवर घणाघाती टीका केली. १९२७ ते १९२९ या काळात त्यांनी 'बहिष्कृत भारत'मध्ये लेखन केले, त्यामध्ये त्यांनी हिंदू संघटनेचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवलेले दिसते. जर अस्पृश्यता दूर करण्याचा प्रयत्न केला, तर तिचे निर्मूलन सहज शक्य होईल, अशी त्या वेळी त्यांची खात्री होती. सर्वसामान्य माणसांना धर्मशास्त्रे वाचण्याची गरज नसते. त्यांचे जे विश्लेषण ब्राह्मण वर्ग करील, ते सर्व लोक मान्य करतात, अशी आंबेडकरांची खात्री होती. ते खरेच असल्याचे आजही पाहायला मिळते. कथा-प्रवचनांसाठीची अलीकडची गर्दी तेच सांगते. म्हणून

हिंदुत्ववादी व्यक्ती आणि संघटना यांची मदत या कालावधीत आंबेडकरांनी घेतली. १९२३मध्ये काँग्रेसने अस्पृश्यतानिर्मूलनाचे कार्य हिंदू महासभेवर सोपवले होते. त्यामुळे या कार्यक्रमाची पार्श्वभूमी असणारी ती एक मोठी संघटना होती. तिचा आधार घेणे आंबेडकरांना क्रमप्राप्त होते. सामाजिक जनजागृतीचे कार्य हिंदू महासभा प्रामाणिकपणे करीत आहे, अशी त्या काळात त्यांची भावना झाली असणे सहज शक्य आहे. ४ सप्टेंबर १९२७ रोजी आंबेडकरांनी 'समता समाज संघा'ची स्थापना केली. हिंदू महासभासुद्धा या वेळी हिंदू धर्मसंघटन करण्याचे कार्य करीत होती. सुरुवातीला समता समाज संघाचे सदस्यत्व सर्वांसाठी खुले होते. 'त्यासाठी ज्याच्या गळ्याला जाती व धर्मदर्शक उच्चनीचत्वाचा फास लागलेला नसेल व त्यामुळे ज्याचा अंतरात्मा आकुंचित व संकुचित होऊन पडला नसेल, असा प्रत्येक मनुष्य समता समाज संघाचा सभासद होऊ शकेल', असे जाहीर करण्यात आले होते. महारांमध्ये वैदिक संस्काराने विवाह व्हावेत, असा कार्यक्रम समता समाज संघाने हाती घेतला होता.

समानता निर्माण करण्यासाठी हिंदू धर्मांतर्गत ज्या चळवळी झाल्या, त्यामधील बहुसंख्य नेत्यांना या वास्तवतेची टोचणी होती की, मुसलमान हिंदूंपेक्षा खूप वेगळे असताना, विरोधी असताना आणि संस्कृतीने भिन्न असताना त्यांना हिंदू समानतेने वागवतात; परंतु हिंदू असणाऱ्या महार-मांगांना मात्र समानतेची वागणूक मिळत नाही. जे अस्पृश्य किंवा इतर कनिष्ठ जातींतील लोक त्या परक्या धर्मात जातात, त्यांना मात्र समानतेची वागणूक मिळते. आंबेडकरांना अशी खात्री होती की, अस्पृश्यांना हिंदू ज्या पद्धतीची वागणूक देतात, तशीच वागणूक मुसलमान देतात. भारतीय राजकारणात आपल्या हक्कांसाठी भांडण्याची जागृती मुसलमानांमध्ये होत होती. त्यामुळे भारतीय राजकारणात त्यांचे महत्त्व वाढू लागले होते. त्यांच्या तुलनेत अस्पृश्यांना कमी महत्त्व दिले जाते, याची खंत आंबेडकरांना वाटत होती. स्वातंत्र्य चळवळीत मुसलमानांना सामील करून घेण्यासाठी काँग्रेसने प्रयत्न करावयास सुरुवात केली. खिलाफत चळवळीमुळे हिंदू-मुसलमानांचे ऐक्य निर्माण होईल, अशी आशा गांधींना वाटत होती; कारण त्यांचे सहकार्य मिळावे म्हणूनच गांधींनी खिलाफतीला काँग्रेसच्या कार्यक्रमाशी जोडून घेतले होते. गांधींच्या त्या प्रस्तावाला काँग्रेसमधील अनेक ज्येष्ठ नेत्यांचा विरोध होता. परंतु गांधींनी त्यांची समजूत घातली. काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात आणि नागपूर अधिवेशनातही गांधींना विरोध करणारे बॅ. जीना बाजूला पडले आणि गांधींची सरशी झाली होती. परंतु त्या काळात अस्पृश्यांकडे मात्र त्यांचे दुर्लक्ष झाले.


सुरुवातीपासूनच आंबेडकर अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे आत्मीयतेने पाहणाऱ्या संघटनांकडे आणि व्यक्तींकडे आकर्षिले गेले होते. १९१३ ते १९१६ या काळात त्यांचा व लाला लजपतराय यांचा घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाला. अस्पृश्यांना हिंदू धर्मात सामावून घ्यायचे प्रयत्न व्हायला हवेत, असे लालाजींना वाटत होते.

अस्पृश्यांना हिंदू समाजात समानतेच्या आधारावर सामावून घ्यायचे असेल, तर त्यांना सुशिक्षित करून उच्च अधिकारांच्या जागांवर बसवण्याचे कार्य हिंदूंनी केले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. १९२०च्या सुमारास आंबेडकर छत्रपती शाहू महाराजांच्या संपर्कात आले. माणगावला अस्पृश्यांची परिषद घेऊन शाहू महाराजांनीच आंबेडकरांना दलित समाजाचे नेते म्हणून प्रस्तावित केले. दलित समाजाचे नेतृत्व दलितानेच करावे, त्यातच दलित समाजाचे हित आहे, असे महाराजांचे मत होते. त्यानंतर शाहूंशी आंबेडकरांच्या नेहमीच भेटीगाठी होत व ब्राह्मणेतर चळवळीस दिशा देण्यासाठी महाराज आंबेडकरांचा सल्ला घेत. 'मूकनायक' नियतकालिक सुरू करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी आंबेडकरांना आर्थिक मदतही केली होती. त्याच काळात स्वामी श्रद्धानंदही अस्पृश्यतानिर्मूलनाचे कार्य गंभीरपणे करण्याचा प्रयत्न करीत होते.

**महाड सत्याग्रहाचे सोनेरी पर्व**

महाड सत्याग्रह हे डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यतानिर्मूलन कार्यक्रमातील एक सोनेरी पर्व मानले जाते. या अवधीतही आंबेडकरांकडून हिंदू संघटनेचा विचार मागे पडला नव्हता. हा सत्याग्रह दोन टप्प्यांत पार पडला. १९ व २० मार्च १९२७ आणि २५ व २६ डिसेंबर १९२७ असे ते दोन टप्पे होते. अस्पृश्यता निर्मूलनासंबंधीच्या महाड सत्याग्रहाच्या पहिल्या टप्प्यात अस्पृश्यांनी महाडच्या चवदार तळ्यावर मिरवणुकीने जाऊन तळ्याचे पाणी चाखले.

त्या मिरवणुकीचे धनंजय कीरांनी केलेले वर्णन असे आहे - 'परिवर्तनाचे कैवारी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर चवदार तळ्याकडे निघाले होते. त्यांच्यामागे कार्यकर्त्यांचा मोठा जमाव होता. हिंदू समाजाला पवित्र वाटणाऱ्या रूढीपरंपरांवर त्यांना आघात करायचा होता. त्यांना नवीन सामाजिक दर्जाची निर्मिती करावयाची होती. माणसांना नव्याने प्रतिष्ठा मिळवून द्यायची होती. हिंदुस्थानातील सामाजिक मानसिकतेविरुद्ध त्यांनी उचललेले ते पाऊल होते. त्यांची ती कृती राष्ट्रनिर्माणाची होती. अस्पृश्य लोक आजवर सामाजिक रूढीपरंपरांच्या वरवंट्याखाली दाबले गेले होते. त्यांनीच अस्पृश्यांची कोंडी केली होती. परंतु आता ते मोठ्या उत्साहाने आपल्या नेत्याच्या




किंमत : ₹ ४००/- । (पृ. सं. २५०)

मागून चालत होते. त्यांचा तो जोम नि उत्साह लाटेसारखा होता. ती लाट सामाजिक असमानतेच्या विरोधात सर्व शक्तीनिशी प्रकटली होती.' परंतु सवर्णांनी अस्पृश्यांवर हल्ला करून त्यांचा सत्याग्रह हाणून पाडला. त्यामुळे आंबेडकरांनी २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी महाड चवदार तळ्याचा दुसरा सत्याग्रह केला.

महाडच्या पहिल्या सत्याग्रहाच्या वेळी डॉ. आंबेडकरांनी जे भाषण केले, त्याची तयारी आंबेडकर ७-८ दिवस करीत होते, असे त्यांचे चरित्रकार खैरमोडे सांगतात. त्यावरून त्यांनी आपले भाषण अतिशय विचारपूर्वक, परिश्रमपूर्वक आणि काही उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून तयार केल्याचे दिसते. चार-पाच वेळा त्यात त्यांनी संदेशवजा सांगितले की, 'हिंदू समाजातील जातिभेद नष्ट करून सर्व हिंदू समाजात एकच वर्ण ठेवणे हाच हिंदू संघटनेचा पाया होय. बाकीची चळवळ व्यर्थ आहे.' हिंदू धर्म आणि राष्ट्रहित यांचा संबंध त्यांनी लावला. 'अस्पृश्यता-निर्मूलनाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गाहून भिन्न नाही. म्हणून मी म्हणतो की, आमचे कार्य जितके स्वहिताचे आहे, तितकेच ते राष्ट्रहिताचे आहे, यात शंका नाही.' असे त्यांचे प्रतिपादन होते. महाड सत्याग्रहाचे कोर्ट प्रकरण १९३७पर्यंत चालले. या प्रकरणात आंबेडकरांची साक्ष १९३०साली झाली. उलटतपासणीत त्यांनी निवेदन दिले की, 'हिंदू धर्मशास्त्राचा पाया चातुर्वर्णीय आहे, असे काही जण म्हणतात. पण ही गोष्ट मला कबूल नाही. हिंदू धर्मशास्त्रात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहेत. या चार वर्णांबाहेर असलेले, पण हिंदुधर्मीय असे लोक अस्पृश्य आहेत, हे मला मान्य नाही. काही हिंदू लोक वेदांना मुळीच प्रमाण मानीत नाहीत. मी 'भगवद्‌गीते'खेरीज कोणत्याही ग्रंथाला पूज्य व प्रमाण मानीत नाही. तरी स्वत:ला मी सनातनी हिंदू मानतो. अस्पृश्योन्नतीच्या चळवळीचा उद्देश समाजक्रांती करण्याचा आहे. समाजक्रांती करताना धर्मक्रांती मला करावी लागली, तर तीही मी करेन. हिंदू समाजाच्या संवर्धनासाठी बेटीबंदी, रोटीबंदी, लोटीबंदी आणि भेटीबंदीची वर्णाश्रमाची चौकट उखडून चार वर्णांचा एक वर्ण केला पाहिजे, असे माझे म्हणणे आहे.'

### आंबेडकरांचा संताप स्वाभाविक

अस्पृश्य समाजावर असलेल्या चार बंदींचा उल्लेख आंबेडकरांनी महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या वेळी केलेल्या भाषणात केला आणि नंतरही काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या काळातही केला. त्या वेळी, 'मंदिरातील मूर्तीसमोर एखादा अडसर उभारावा आणि स्पृश्य हिंदू व अस्पृश्यांना तेथपर्यंतच जाता यावे व त्यांनी तेथूनच देवदर्शन घ्यावे.' असे श्री. म. माटे यांनी सुचवले होते. त्यावर डॉ. आंबेडकरांनी 'माट्यांचा प्रस्ताव, आम्हांला मिळाले नाही तरी चालेल; परंतु तुम्हांला मात्र मिळता कामा नये, या वृत्तीचा आहे.' या शब्दांत संताप व्यक्त केला होता. माट्यांच्या सूचनेने अस्पृश्यता संपणार नव्हती, तर ती आहे तशीच राहणार होती; कारण

देवाला विटाळ होऊ नये म्हणून स्पृश्य हिंदूंचा अस्पृश्यांनी मंदिरात जायला विरोध होता. तो सैल करून त्यांना मंदिरात जाऊन अंतर राखून त्याचे दर्शन घेता येणार असले, तरी त्यांचे ते अंतर देव विटाळायला नको, या खबरदारीने निर्धारित केले जाणार होते आणि अस्पृश्य मंदिरात न गेले काय किंवा मंदिरात जाऊन त्यांनी दुरून दर्शन घेतले काय, त्याने अस्पृश्यांशी वागणूक आधी होती तशीच राहणार होती.

१९३१मध्ये सावरकरांच्या सूचनेवरून रत्नागिरी येथे भागोजी बाळाजी कीर यांनी अस्पृश्यांसाठी पतित पावन मंदिर बांधले, तेव्हा आंबेडकरांनी 'अस्पृश्यांसाठी खास देवळे बांधल्याने स्पृश्य-अस्पृश्य यांच्यातील भेदरेषा कायम होणार आहे.' अशी प्रतिक्रिया दिली. आंबेडकरांच्या मते अस्पृश्यांसाठी वेगळी मंदिरे बांधल्याने सवर्णांना आपली मंदिरे विटाळापासून सुरक्षित राहिल्याचे समाधान मिळणार होते. शिवाय आधीचे अस्पृश्यांचे मरिआई, मेसकाई, रानाई, म्हसोबा, बिरोबा इत्यादी देव गावाबाहेर असताना आणि सवर्ण त्यांना भजत नसताना त्यात अस्पृश्यांच्या आणखी एका देवाची भर पडणार होती. अस्पृश्यता ही जैसे थे राहणारच होती. वरील दोन्ही प्रकारांत सवर्णांना आपल्या जातिभावनेला धक्का बसू द्यायचा नव्हता, असे स्पष्ट दिसत होते. त्यामुळेच आंबेडकरांचे संतापणे साहजिकच मानावे लागते.

१९३१पर्यंत आंबेडकरांचे हिंदुत्वप्रेम दिसत असले, तरी १९१९मध्ये साऊथबरो कमिशनसमोर अस्पृश्य हिंदूंपेक्षा वेगळे आहेत, हे सांगण्याचा प्रयत्न ते करीत होते. ते करताना त्यांनी हिंदू धर्मावर जी टीका केली, तिच्यावरच अभ्यासकांनी अधिक लक्ष केंद्रित केले व त्यामुळे आंबेडकरांची हिंदुत्वविषयक भूमिका काहीशी दुर्लक्षित राहिली, असा मुद्दा येथे विचारात घ्यायला हवा. आंबेडकरांनी अपेक्षिलेले हिंदू


अभिनंदन!

प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठान, नांदेड




प्रसाद बन वाङ्मय सर्वोत्कृष्ट पुस्तक पुरस्कार

वसुंधरेचे शोधयात्री

◆

डॉ. अनुराग लव्हेकर



संघटन यशस्वी झाले असते, तर अस्पृश्यांचे संख्याबळ हिंदुत्ववाद्यांच्या पारड्यात पडले असते. असे असताना आंबेडकर काँग्रेसला हिंदूंची संघटना म्हणत. वस्तुस्थितीमध्ये आंबेडकरांनी हिंदू संघटनेबद्दल ज्या हिंदू महासभेला सहकार्य देऊ केले, तीच संघटना हिंदूंचे संघटन जपणारी संघटना होती आणि काँग्रेसनेही अस्पृश्यतानिर्मूलनाचे कार्य तिच्यावर १९२३मध्ये सोपवले होते व एका परीने अस्पृश्यांना हिंदू महासभेच्या हवाली केले होते. साऊथबरो कमिशन १९१९ आणि सायमन कमिशन १९२८ यांच्या समोर त्यांनी दिलेल्या साक्षींमध्ये अस्पृश्य त्यांच्या दृष्टीने हिंदूंपेक्षा वेगळे कसे होतात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी १९२७मध्ये हिंदूंची वर्णव्यवस्था मोडून चार वर्णांचा एक वर्ण करण्याचे आवाहन आंबेडकरांनी केले आणि १९२८मध्ये सायमन कमिशनसमोर साक्ष देताना अस्पृश्य पृथक व हिंदू समाजापासून वेगळे असल्याचे निवेदन दिले.

❖

। श्रद्धांजली ।



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे' या संस्थेचे कार्यवाह आणि राजहंस प्रकाशन प्रकाशित 'गझलसम्राटाच्या सहवासात' या पुस्तकाचे लेखक दीपक करंदीकर यांचे दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी दु:खद निधन झाले.

राजहंस प्रकाशन परिवारातर्फे **दीपक करंदीकर** यांना श्रद्धांजली.





मराठी गझलेच्या प्रदेशात मध्यरात्रीही तळपळणारा सूर्य म्हणजे सुरेश भट! त्या भटांचे गंडाबंध शागिर्द म्हणजे दीपक करंदीकर. त्यांना लाभला गुरूंचा सोनेरी सहवास. त्यातून साकारलेले –

**गझलसम्राटाच्या सहवासात**

दीपक करंदीकर

किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# चित्र पाहीन आवडी

## चित्रांची मांदियाळी : ‘पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट’

पुण्याच्या दृश्यकलेचा कॅनव्हास मोठा विस्तृत आहे. सोळाव्या शतकापासून आपल्याला ह्या शहरात चित्रकला काहीनाकाही रूपात दिसायला लागते, ही दृश्यकला परंपरा पुढे विकास पावत गेलेली दिसते. एखाद्या शहरातील दृश्यकला एकत्र पाहणे, हा अनुभव आपल्याकडे दुर्मीळ आहे. भारतातील मोजक्याच प्रयोगांतील हा एक प्रयोग आहे. असे शहराचे कलादालन सर्वच शहरांमध्ये झाले, तर प्रांतिक समकालीन कलांचे जतन होईल व त्या प्रदर्शित होतील.

नुकतेच ‘महाराष्ट्र कल्चरल सेंटर’ ह्या संस्थेने ‘पुणे गॅलरी ऑफ व्हिज्युअल आर्ट’ नावाने शहरातील चित्रकार आणि शिल्पकार ह्यांची चित्रे कायमस्वरूपी एकत्र पाहता येतील, अशी जागा संस्थेच्या हिराबाग इमारतीत तयार केली आहे. ‘चित्र पाहीन आवडी’च्या प्रवासात आपण याची नोंद घेऊ या. कारण हा असा आपल्या परिसरातील पहिलाच प्रयत्न आहे. दृश्यकलेचे संकलन, जतन आणि संवर्धन ह्यामध्ये होणार असून शहरातील सर्व शैलींतील आणि काळांतील चित्रकामे येथे एकत्र पाहता येणार आहेत. त्यात नाना प्रकारची निसर्गचित्रे, शहरांची चित्रे, व्यक्तिचित्रे आणि अभिव्यक्त झालेली चित्रे ह्यांचा समावेश आहे. अमूर्त चित्रे मोठ्या प्रमाणात पुणे शहरात होतात. त्याचे प्रतिबिंब ह्या प्रदर्शनात दिसून येते.

काळ, तंत्रज्ञान, अर्थकारण ह्यात बदल झाला की चित्रांच्या शैली आणि विषयमांडणीवर परिणाम होतो. तो परिणाम आपल्याला ह्या प्रदर्शनात पाहता येतो. अनेक चित्रकार आपल्या परिसराला आणि आजूबाजूच्या बदलत्या जीवनाला प्रतिसाद देताना दिसतात. डिजिटल माध्यमात प्रयोग करणारे चंद्रमोहन कुलकर्णी, नचिकेत प्रकाश आपल्याला अतिवास्तव मूडकडे घेऊन जातात; तर नवे चित्रकार प्रतिमांची तोडमोड आणि पुन: जुळणी करताना दिसतात. हे बदल शहरीकरणाच्या रेट्याचे प्रतिनिधित्व करतात. उदाहरण म्हणून यातील शिल्पा जोगळेकर आणि पांडुरंग ताठे यांची चित्रे पाहू. पर्वती पायथ्याला राहणारे ताठे गेली तीन दशके आजूबाजूच्या वस्त्या आपल्या चित्रात रंगावतात, तर शिल्पा आपल्या चित्रात नागरीकरण वेगळ्या पद्धतीने मांडते. ती प्रवासी चित्रकार म्हणता येईल. मांडणीशिल्पे हा तिचा अभिव्यक्तीचा मार्ग असून त्या निमित्ताने ती जगभर फिरत असते.

ह्या प्रदर्शनाचे आकर्षण म्हणजे प्रसिद्ध चित्रकार सुधीर पटवर्धन यांचे एक



रेखाचित्र आहे, त्यात एक व्यक्तिसमूह दिसून येतो. ह्या व्यक्ती आपापसात गप्पा मारताना दिसत आहेत. गप्पा रंगल्या असून त्यातील प्रत्येक पात्राची बसायची ढब आणि कपडे वेगळे आहेत. ह्या रेखाचित्रात एक प्रकारची सहजता दिसते. ही पेन्सिल माध्यमातील रेखाचित्रे लक्षवेधक आहेत.

त्याचबरोबर सुहास बहुळकर, राजाराम होले अशा पुण्यातून मुंबईला जाऊन नामवंत झालेल्या चित्रकारांची चित्रे आहेत. बहुळकरसर अनेक वर्षे पुण्यातील जुन्या वाड्यांमधील जीवनावर चित्रे करताना दिसतात. लोकजीवन-स्त्री-पुरुष प्रतिमा-खिडक्या-जाळी-दरवाजे-खांब चित्रात वारंवार डोकावतात आणि आपल्याला त्या काळात मागे घेऊन जातात. अशाच एका चित्राचा ह्यात समावेश आहे. शिवाय पुण्यात बाहेरगावाहून आलेल्या आणि येथे स्थिरावलेल्या मंडळींच्या कलाकृती आहेत. जसे की गौरी गांधी यांची मातीची शिल्पे किंवा प्रभाकर सिंग यांची धातू-शिल्पे त्याची साक्ष देतात. केवलाकारी चित्रे जास्त प्रमाणावर दिसतात. त्यात विक्रम कुलकर्णी, रुपेश हिरगुडे आणि राजू सुतार यांच्या चित्रांचा समावेश आहे. केशव कासार ह्याने 'तंत्र' चित्रांचे केलेले प्रयोग येथे दिसतात.

माध्यमांमध्ये नवेपण लाभावे ह्यासाठी वैशाली ओक कापडाचा वापर करते, तर विक्रम मराठे गंजण्याच्या प्रक्रियेचा वापर करतो. नव्या पिढीतील कलावंत 'अक्षरे महत्त्वाची का दृश्य महत्त्वाचे' हा मुद्दा मांडताना दिसतात. किरण ह्या चित्रकर्तीने एका पाटीवर मजकूर लिहिला असून त्याशेजारी एक चित्र मांडले आहे, हेतुपूर्वक ती हे द्वंद्व दर्शवते. जगभर चालू असलेले कलाप्रवाह पुण्यातील कलाकार मंडळींनी वेळोवेळी आपलेसे केलेले दिसतात.

पुण्यात फोटोग्राफ माध्यमात झालेले प्रयोग दृष्टीस पडतात. उदय बंदिवाडेकर



आणि संदेश भंडारे यांच्यासोबत अनेक कलावंतांचे मूळ फोटो येथे दिसून येतात. दृश्यसाक्षरता वाढवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न संस्था अनेक वर्षे करीत आहे. त्यातील हे पुढील पान म्हणता येईल. ह्यातील चित्रे कायमस्वरूपी संग्रही असून, प्रदर्शन मांडणी कालांतराने बदलती राहणार आहे. विद्यार्थी आणि रसिकजन समूहाने आल्यास 'गायडेड टुर'ची व्यवस्था करण्यात येणार आहे.

ही चित्रांची मांदियाळी आपण 'चित्र पाहीन आवडी'च्या वाचक मंडळींनी पाहायला हवी.

***नितीन हडप,*** ९३७२४१८६१५


समाजात समांतरपणे अनेक व्यवस्था कार्यरत असतात.
क्षेत्र कोणतंही असो, तिथे भ्रष्ट आणि वेळकाढू माणसं असतातच.
एकंदरच माणसाचा जीवनव्यवहार हा परस्परविरोधी असतो.
या व्यवहाराचं एक चित्र म्हणजे...

संभ्रमाची गोष्ट

पी. विठ्ठल

किंमत : ₹ ३८०/- । (ट. ख. ₹ ५०)



## ‘चित्रकला’ या विषयावरील ‘राजहंसी’ पुस्तके



प्राचीन काळापासून ते भारतीय आधुनिक कलाप्रवाहापर्यंतचे एकमेकांत गुंफलेले धागे चित्रकाराच्या मर्मदृष्टीने आणि कलाअभ्यासकाच्या वस्तुनिष्ठतेने उलगडून दाखवणारा ग्रंथ.


कलेतील भारतीयत्वाची चळवळ

### द बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट स्कूल

सुहास बहुळकर

किंमत : ₹ ६००/- । (ट.ख. ₹ ५०)

दीनानाथ दलालांनी जनसामान्यांच्या घराघरांत आणि मनामनांत आपली चित्रे पोहोचवली. विविध प्रयोगांमधून कलेची वेगवेगळी क्षितिजे धुंडाळणाऱ्या या रंगरेषाप्रभूच्या जीवनाचे वेगवेगळे पैलू दर्शवणारे वेधक चरित्र




रंगांचा जादूगार **दीनानाथ दलाल**

डॉ. अनंत देशमुख

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)




१८५७-१९५० या काळाच्या पार्श्वभूमीवर आजवर अपरिचित असलेल्या पाच स्त्री चित्रकार! अँजेला त्रिंदाद, अंबिका धुरंधर, विमल गोडबोले, मारी हेंडरसन, मग्दा नाख्मन यांच्या कौटुंबिक जीवनाचा आणि कर्तृत्वाचा शोध आणि बोध!

‘बाँबे स्कूल’ कला परंपरेतील

### स्त्री चित्रकार (१८५७-१९५०)

साधना बहुळकर

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)



# असे जन्मले पुस्तक!

## काश्मिरियत


भारत, पाकिस्तान देशांतील सीमेवर एकटीने भटकंती करायची असे ठरवले, तेव्हाच एकेक घटना अशी घडत गेली की हा प्रवास सर्वसामान्य नसणार हे लक्षात आले. पुढे या भन्नाट प्रवासात जे काही होत होते, ते लोकांना सांगता यावे अशी ओढ कायम होतीच. त्याच ओढीने प्रवासात रोज जे काही अनुभव यायचे आणि त्यावर माझे मनोमन चिंतन व्हायचे, त्याची डायरी लिहायची नेम ठेवला होता.

'काश्मिरियत' ही सत्यकथा, त्याच डायरीतल्या पानांचे पुस्तकाच्या स्वरूपातच केलेले रूपांतर आहे.

चोखंदळ मराठी वाचकला उत्तम साहित्य वाचायला आवडते, तसेच पारदर्शकपणे मांडलेला सत्य अनुभवसुद्धा वाचायला नक्कीच आवडेल असे वाटले.

कॉलेज, युनिव्हर्सिटीमधली तरुण मुले जी काश्मीरबद्दल इकडे तिकडे माहिती मिळवत असतात, ती डोक्यात होतीच. शिवाय सध्या काश्मीर टुरिझम किंवा त्यातही बॉर्डर टुरिझम जोम धरत आहे. त्या दृष्टीने त्या सर्वांनी वाचायलाच हवे असे हे पुस्तक आहे.

पण माझी एक सुप्त इच्छा होती, की या पुस्तकाकडे काश्मीरचे प्रवासवर्णन किंवा लेखिकेचे धाडस एवढ्याच संकुचित स्वरूपात पाहू नये. वाचकांना कळावे, की काश्मीर हे फक्त रूपक आहे. सुप्रिया ही फक्त कॅरेक्टर आहे. असे धरले, तर या पुस्तकातून स्वत:चे आयुष्य बदलून टाकणारे असे सार नक्कीच वेचता येईल. अशा प्रकारे, अभ्यासाच्या दृष्टीने पुस्तक वाचणारे पुस्तकाचे किडे तर या पुस्तकाचे सर्वांत चांगले वाचक होऊ शकतात.




किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. ₹ ५०)

डायरी तयार होतीच, पण वाचकांना पुस्तक रोजनिशीच्या स्वरूपात कसे वाचायला देऊ; म्हणून एकेका गावी चारपाच दिवस राहिले, तेव्हा काय काय

घडले त्याची गोष्टीरूप मांडणी केली. ते करताना माझी पुरेवाट झाली. टप्पे हा फार सुटसुटीत शब्द झाला, पुढे ओघ असणारा...

मला तर असे वाटते, की मी गुंता सोडवावा तशा थाटात ते काम पाडले. त्यावर सलग काम करूनही मला त्याला चार ते सहा महिने लागले. कित्येक गावांच्या, माणसांच्या जागी टिंब टिंब काढली होती वगैरे वगैरे... मग कासवगतीने प्रुफरीडिंग करायला आणखी सहा महिने गेले. असा तो गुंता मी वर्षभर सोडवत बसले होते.

पुस्तक प्रकाशित झाल्यावर हुश्श... वाटले.

हे माझे पाहिले आणि शेवटचे पुस्तक असे वाटले.

आणि अनेक लोकांचे खूप खूप ऋण आहेत असे वाटले.

नंतर वाचकांनी ते पुस्तक डोक्यावर घेतले. अनेक फोन आणि प्रतिक्रिया आल्या, त्यामुळे सगळे श्रम विसरून गेले आणि पुढचे पुस्तक लिहू या का, असे वाटायचा सध्या काळ सुरू आहे.

प्रतिक्रियेच्या बाबतीत काही गोष्टी विशेष वाटल्या त्या अशा...

८२ वर्षांच्या आजीने, ७० वर्षांच्या आजोबांनी स्वहस्ते ३-५ पानी प्रतिक्रिया लिहून पाठवल्या.

एका आजीने नाशिकला रेडिओवर 'मला आवडलेले पुस्तक'मध्ये 'काश्मिरियत'वर कार्यक्रम केला.

मराठी पुस्तके न वाचणाऱ्या एका वाचकाने आयुष्यात प्रथम मराठी पुस्तक वाचले.

एका आईने आपल्या मुलाला त्यातून काही शिकता येईल, म्हणून पुस्तकाचे सामुदायिक वाचन केले.



अनेक अनोळखी लोकांनी माझी ओळख करून घेता यावी, म्हणून माझा फोन नंबर शोधून काढून मला फोन केला.

तीन-चार जणांनी इंग्लिश भाषांतर करण्यासाठी स्वखुशीने तयारी दाखवली.

अशा रीतीने माझ्या पहिल्या पुस्तकाचा हा प्रवास घडला आणि तो तुम्हाला सांगताना मी तो परत एकदा अनुभवला.

***सुप्रिया राज***



# आठवणींच्या खिडकीतून

## सुबह-सुबह 'उंबरठा'वर आदळलो...

जब्बार पटेल यांनी 'उंबरठा' (हिंदी - 'सुबह') हा अतिशय सुरेख, सामाजिक आशय असलेला चित्रपट दिग्दर्शित केला. या चित्रपटाचे समाजाच्या सर्व स्तरांतून प्रचंड स्वागत झाले. कथा-पटकथा-संवाद-गीतरचना-संगीत, दिग्दर्शन, अभिनय आणि चित्रपटाची सर्व तांत्रिक अंगे या सर्वच बाबतींत 'उंबरठा' दर्जेदार होता. स्मिता पाटीलने या चित्रपटात सुलभा महाजनची भूमिका अतिशय प्रभावीपणे साकारली आहे. गिरीश कार्नाड, श्रीकांत मोघे, आशालता, कुसुम कुलकर्णी ते वेगवेगळ्या हौशी नाट्यसंस्थांतील अनेक छोटे-मोठे कलाकार - विशेषत: स्त्रीकलाकार 'उंबरठा'मध्ये आहेत; जसे ते 'सिंहासन'मध्येही दिसतात. आणि नेहमीचेच 'यशस्वी कलाकार' या कॅटेगरीतल्या मीही 'उंबरठा'मध्ये छोटीशी भूमिका निभावली आहे. पत्रकार तिरोडकर ही ती भूमिका आहे. आश्रमाच्या कार्यकारिणीचा एक सदस्य आणि गावपातळीवरील वृत्तपत्राचा संपादक अशी ही भूमिका. दया डोंगरे, सतीश आळेकर, बाबुराव विजापुरे, नलिनी कानिटकर आणि सौ. दळवी वहिनी (प्रसिद्ध रंगभूषाकार निवृत्ती दळवी यांची पत्नी) असे कमिटीचे इतर मेंबर. जब्बार पटेल यांचे कोणत्या भूमिकेसाठी कोणाला निवडायचे आणि त्यांच्याकडून उत्तम काम कसे करून घ्यायचे, याचे कौशल्य या ठिकाणी आणि 'उंबरठा'मधील अनेक दृश्यांमध्ये त्यांनी विविध भूमिकांसाठी निवडलेल्या कलाकारांमधून दिसून येते. इतकेच नाही, तर 'येरवडा इंडस्ट्रियल स्कूल'मधील 'दगडाची पार्थिव भिंत'सुद्धा 'उंबरठा'मधील एक महत्त्वाची कॅरेक्टर झाली आहे, हे माझे ठाम मत आहे. 'योजकस्तत्र दुर्लभ:' हेच खरे.

आश्रमातील सर्व दृश्ये येरवडा इंडस्ट्रियल स्कूलमध्येच चित्रित झाली आहेत. माझ्यासाठी दोन सीन होते. एक मॅनेजिंग कमिटीचा, सर्व कलाकारांबरोबर आणि दुसरा वृत्तपत्राच्या ऑफिस-कम-प्रिटिंग प्रेसमध्ये सुलभा महाजनबरोबर (स्मिता पाटील). संस्थेच्या मोठ्या हॉलमध्ये आणि संस्थेच्याच प्रिंटिंग प्रेसमध्ये ही दोन्ही दृश्ये चित्रित करण्यात आली. जब्बारकडे काम करताना किंवा मी ज्या ज्या चित्रपटांमधून छोट्या-छोट्या भूमिका केल्या, त्या ठिकाणच्या काही गोष्टी माझ्यासाठी फार महत्त्वाच्या आणि शिकण्याजोग्या ठरल्या. जब्बारशी किंवा सई परांजपे, सुमित्रा भावे, सुनील सुकथनकर, संजय सूरकर, अमोल पालेकर, स्मिता तळवलकर इत्यादी दिग्दर्शकांबरोबर माझी

मैत्री असल्यामुळे दुय्यम-तिय्यम भूमिकेत असूनही मला कधीही एक्स्ट्रा नटाची वागणूक मिळाली नाही. त्यामुळे जेवढा वेळ मिळेल, त्याचा उपयोग करून मी शूटिंग असलेल्या ठिकाणीच वावरायचो आणि तोंडातून एक शब्दही न काढता, त्यांच्या चाललेल्या कामात उगाचच तोंड न घालता शूटिंग 'अनुभवत' असायचो. त्यामुळे 'उंबरठा'मध्ये 'गगन सदन' प्रार्थना सुरू असताना मध्येच कसा पाऊस आला आणि पांगापांग झाली, 'चांद मातला मातला'चे शूटिंगच्या वेळी जयमाला काळे-इनामदार यांनी कसा डान्स बसवला आणि त्याचे शूटिंग किती झटपट उरकले - अशा प्रत्येक चित्रपटाच्या किती वेगवेगळ्या आठवणी!

'उंबरठा' प्रदर्शित झाला आणि प्रेक्षकांना तो पसंत पडला. वृत्तपत्रे, मासिके यांच्या समीक्षकांनीही त्यावर भरभरून लिहिले. हिंदीमध्ये तयार केलेला 'सुबह'ही गाजला. मात्र या दोन्ही चित्रपटांच्या शेवटच्या सीनबाबत समीक्षकांत आणि सर्वसामान्य रसिकप्रेक्षकांत थोडेसे मतभेद होते. सुलभा महाजन (स्मिता पाटील) अखेर आपले घर सोडून बाहेर पडते आणि रेल्वेत बसून पुढच्या प्रवासाला निघते, असा 'उंबरठा' चित्रपटाचा शेवट आहे. 'हा शेवट अगदी योग्यच आहे' अशी भूमिका मान्य असलेला एक गट आणि 'छे! छे! तिनं आपलं घर सोडून बाहेर पडू नये आणि संघर्ष करीत राहिलं पाहिजे' अशी भूमिका मान्य असलेला दुसरा पक्ष. प्रत्येकाला मतस्वातंत्र्य आहे हे जरी मान्य केलं, तरी या उंबरठ्यामुळे सकाळी-सकाळीच माझ्यावर नौबत कशी आली, हे सांगण्यासाठीच ही सारी प्रस्तावना.

मी सूर्यवंशी म्हणजे 'सकाळी लवकर उठे, लवकर निजे, त्यास आरोग्य लाभे' असं चुकूनही न मानणारा निशाचर. नाटक, सिनेमा, तमाशा, संगीत यांत रमलेली माणसं (?) बहुतेक आमच्याच पंथातली. त्या दिवशी कशी कोण जाणे, मला लवकरच जाग आली आणि काय दुर्बुद्धी झाली राम जाणे, बाहेर फिरायला जाण्याची लहर आली. आमच्याच कॉलनीमधल्या रस्त्यावरून फिरायला बाहेर पडलो. सकाळी



गुरुदत्तच्या चित्रनिर्मितीच्या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमीबरोबरच सदर पुस्तकात गुरुदत्तच्या चित्रपटांचा कथावस्तू, घाट, तंत्र आणि आशय या अंगांनी विचार केला आहे.

**गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका**

अरुण खोपकर

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ४५०/- । (ट.ख. ₹ ५०)

सात-साडेसातची वेळ. रस्त्यावर तुरळक रहदारी. चालण्याचा व्यायाम व्रतस्थपणे आचरणात आणणारे काही वृद्धकपि आणि कपिला घरी परतू लागलेले. अचानक चौकात वीस-बावीस वर्षांची एक युवती माझ्यासमोर आली आणि तिने माझा हात गच्च पकडला आणि कडाडली, ''सांगा तुमच्या त्या जब्बार पटेलला. सुलभा महाजननं आपलं घर सोडून अजिबात जाता कामा नये. बदल म्हणावं उंबरठाचा शेवट.'' माझा एक हात पकडून, दुसऱ्या हाताचे हातवारे करीत ती असे बरेच काही बोलत होती. आवाजाची पट्टी पाचपन्नास माणसांना सहज ऐकू जाईल अशी. या आकस्मिक हल्ल्यानं आणि तोफगोळ्यानं मला बघता-बघता घामच फुटला.

- वास्तविक ही मुलगी माझ्या अल्पशा परिचयाची होती. तिचे आई-बाबा आणि एक भाऊ माझ्या घरी आले होते. त्यांना नाट्य-चित्रपट-वाङ्मय यांची मनापासून आवड होती. वडलांबरोबर ही मुलगीही दोन-चार वेळा घरी आली होती. तिच्या वडलांचं आणि माझं बोलणं सुरू असताना मध्येच ती वेगळ्याच विषयांवर असंबद्ध बोलायची. तिला थांबवता थांबवता वडलांच्या नाकी नऊ यायचे. आम्हा उभय पतिपत्नींना याची चांगलीच जाणीव झाली होती. तिला मेडिकल ट्रीटमेंटची गरज आहे, हे कळून चुकले होते. हिचे पुढचे आयुष्य कसे असणार आहे, याचीही काळजी आम्हाला वाटायची.

तर त्या तरुणीनं सकाळी-सकाळी माझा हात पकडला आणि फर्मान काढलं - ''सांगा तुमच्या जब्बारला. शेवट बदल म्हणावं!'' जसजसा तिचा आवाज तापत होता, तसतशी आमच्याभोवती बघ्यांची गर्दी वाढू लागली. कुणाला वाटलं, या मुलीचा मी विनयभंगच केला. माझ्या तावडीमधून सुटका करून घेण्यासाठी ही आरडाओरडा करते आहे.

'शोभतं का तुम्हाला हे?' एक भग्नदंत गृहस्थ माझ्यावर खेकसले. 'काय बाई हा निलाजरेपणा! सकाळी-सकाळी हा प्रकार!' एक बुढ्ढी पचकली. कुणी काही - कुणी


वाचकाला मनाने, ज्ञानाने अधिक समृद्ध बनवणारी
मिस्कील शैलीतली साहित्य, कला, संगीत
यांची खुमासदार मैफल!

सांगतो ऐका...

मनोहर पारनेरकर

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. ₹ ५०)



काही अशी शब्दांची लाखोली माझ्यावर वाहू लागले. मी बधिर झालो होतो. कान पाडून मुकाट्याने सर्व ऐकून घेत होतो. नशीब माझं, कुणी माझ्या कानाखाली जाळ काढला नाही.

आणि काय चमत्कार झाला देव जाणे, ती मुलगीच बोलायला लागली, ''हे रानडेकाका माझ्या बाबांच्या ओळखीचे आहेत. हे नाटका-सिनेमांतून काम करतात. जब्बार पटेलांचे हे मित्र आहेत. त्यांनी जब्बार पटेलांच्या 'उंबरठा'मध्ये काम केलंय. मी तो सिनेमा पाहिला. त्याचा शेवट मला नाही पटला. मी यांना सांगत होते, जब्बार पटेलांना सांगून शेवट बदला!''

त्या मुलीच्या मुखातून साक्षात सरस्वतीच बोलत होती. आणि बघता-बघता बघ्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते. माझ्याविषयीचे कुतूहल जागृत होऊ लागले होते! मी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्या सकाळी-सकाळी त्या मुलीला जर शहाणपणाचे बोल बोलणे जमले नसते, तर माझी काही खैर नव्हती. सुबह-सुबह मी उंबरठ्यावर ठेचकाळलो होतो. लोकांनी माझी धू धू धुलाई केली असती. पोलीस स्टेशनमध्ये वेगळा खुराक मिळाला असता आणि दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रामध्ये पहिल्या पानावर फोटोसकट बातमी झळकली असती...

'उंबरठा' चित्रपटात तिरोडकर या पत्रकाराची भूमिका करणाऱ्या एका कलाकाराला तरुणीचा विनयभंग प्रकरणी अटक...

सुबह-सुबह ही उंबरठ्यावर लागलेली ठेच अजूनही पूर्णपणे बरी झालेली नाही. आठवणींच्या खिडकीतून मी ती दूर करण्याचा प्रयत्न करतो; पण कितीही जरी दारं घट्ट बंद करून खिडकी बंद करण्याचा प्रयत्न केला, तरीही आठवणींची सल फटीतून डोकावतेच.

***श्रीराम रानडे***
९८२३१४४७०९




साठोत्तर प्रायोगिक (समांतर) मराठी रंगभूमीचे केवळ साक्षी नव्हे,
तर निरनिराळ्या नात्यांनी प्रत्यक्ष सहभागी असलेले
प्रतिभावान रंगकर्मी माधव वझे यांनी
अनेक संदर्भबिंदूंच्या मदतीने घेतलेला
पाश्चात्त्य आणि मराठी रंगभूमीचा अभ्यासपूर्ण वेध.

**समांतर रंगभूमी : पल्याड-अल्याड**

माधव वझे

किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. ₹ ५०)

## क...
## कवितेचा

मराठी मनाच्या सर्जनशीलतेला
पाऊलवाट देणारे सदर

### कोवळी तिरीप

शब्द जायबंदी होण्याचे दिवस
जगण्याच्या काळ्या करड्या कॅनव्हासवर
दु:खाचा गोल गरगरीत तुकडा
कुठवर सांभाळत राहावं

अनोळख दाखविणाऱ्या दिशांचा मागमूस शोधत
परागंदा होण्याची शक्यता
धूसर नाहीये अजिबात
कातळावर पडणारा काळाचा एक एक थेंब
काय सांगू पाहतोय
या अगम्य कोलाहलात

मौनाच्या धगीत होरपळत
शब्द जायबंदी होण्याचे हे दिवस
रोखून पाहतायत
संशयाच्या सुया आरपार टोचत
आणि अस्थिरतेचा लंबक
तर थांबत नाहीये कधीचा

पापण्यांआडची जायबंदी स्वप्नं
कशीबशी सांभाळत
आपण तोलू पाहतोय
उजेडाची एक कोवळी तिरीप
तेव्हा निदान वाटावा भरवसा जगण्याचा
अशी एकही गोष्ट असू नये का
भासमान सत्याचे शून्य
आ वासून समोर उभे असताना...

***योगिनी सातारकर-पांडे***
९८८१७१७०२७


आशय, अभिव्यक्ती व भाषा अशा काव्याच्या अंगांनी समृद्ध असलेली ही कविता केवळ आंबेडकरीच नव्हे, तर समकालीन मराठी कवितेची कक्षा विस्तारणारी कविता आहे!



रक्तफुलांचे ताटवे

नोमेश नारायण

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. ₹ ५०)



एकाच कवीने तीन वेगवेगळ्या काळांच्या पटावर नजर ठेवून आयुष्याचे जे तत्त्वज्ञान तयार केले आहे, ते जगण्याचा हिशेबच. हा कवितासंग्रह म्हणजे कवीच्या जगण्याचा वैचारिक लेखाजोखा!

आतून उगवलेल्या कविता

प्रा. प्र. द. कुलकर्णी

किंमत : ₹ १७०/- । (ट.ख. ₹ ५०)

## उद्गार

नियतकालिकांचे/
समाजमाध्यमांचे अभिप्राय

# सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी

*स्वत:ची गोष्ट सांगतानाच, माधव गाडगीळ यांनी आपल्या ‘सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी’ या पुस्तकात आपला अभ्यासाचा, संशोधनाचा विषय विषद करताना जंगलांबद्दल, देवरायांबद्दल, गवळी-धनगर-आदिवासी आदींबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल आणि विज्ञानाबद्दलही विस्ताराने लिहिले आहे.*

माधव गाडगीळ हे देशातील अग्रगण्य मा. शास्त्रज्ञांपैकी एक. परिसर आणि पर्यावरण विज्ञान हे त्यांच्या संशोधनाचे मुख्य क्षेत्र. संपूर्ण निसर्ग हीच त्यांची प्रयोगशाळा. गेल्या सहा दशकांहून अधिक काळ ते या प्रयोगशाळेत रमले आणि पशू-पक्षी, वनस्पती, पाणी, नैसर्गिक संसाधने, निसर्ग-मानव संबंध, मानवी हस्तक्षेप आदींबद्दल मोलाचे संशोधन केले आहे. निरीक्षण आणि अभ्यास यांद्वारे सजीवसृष्टीला समजून घेण्यात, त्यातील काही कोडी, रहस्ये उलगडण्यात यशस्वी ठरलेले गाडगीळ हे सच्चे निसर्गप्रेमी आहेत. कथित भौतिक विकासाच्या मागे लागून निसर्गाला ओरबाडण्याच्या वाढत चाललेल्या मानवी विकृतीच्या विरोधात ते निडरपणे आवाज उठवीत आले आहेत. निसर्गाशी समरस होऊन जगणाऱ्यांच्या प्रथा-परंपरांकडे डोळसपणे पाहून, त्यांच्या हक्कांबद्दलही ते बोलत आले आहेत. आतापर्यंतचा आपला हा सारा प्रवास त्यांनी ‘सह्याचला आणि मी : एक प्रेमकहाणी’ या नावाने शब्दबद्ध केला आहे. त्यांचे हे आत्मचरित्र म्हणजे केवळ त्यांची कहाणी नाही, तर एका संवेदनशील शास्त्रज्ञाचे निसर्गचिंतन आहे. हे आत्मचरित्र म्हणजे परिसर आणि पर्यावरण विज्ञानाचा महत्त्वाचा दस्तावेज म्हणावा लागेल.

गाडगीळ हे केवळ निसर्गाशीच नव्हे, तर लोकजीवनाशी समरस झालेले शास्त्रज्ञ. विज्ञानाप्रमाणेच ते साहित्य आणि कलेचेही अभ्यासक, बहिणाबाईंपासून ना. धों. महानोरांपर्यंत आणि मंदार दातारांपासून जसिंता केरकट्टा या विविध कवींच्या उद्धृत केलेल्या पंक्तींतून किंवा लोकगीते, लोकनृत्य आणि स्थानिकांची खाद्यसंस्कृती यांबद्दलच्या उल्लेखांतून गाडगीळ यांची साहित्य-संस्कृती यांबद्दलची आस्वादक वृत्ती अधोरेखित होते. स्वत:च्या जडणघडणीबरोबरच साहित्य, संस्कृती आणि मुख्य

म्हणजे विज्ञान या साऱ्यांबद्दल त्यांनी चिकित्सक विवेचन केल्याने, त्यांचे आत्मचरित्र अभ्यासपूर्ण झाले आहे. विज्ञानाद्वारे मानवाचे कल्याण व्हावे; परंतु कथित विकासाच्या नावाखाली मानवाने निसर्गाचा विद्ध्वंस करू नये, अशी ठाम भूमिका घेऊन त्यांनी वाटचाल केली. त्यांच्या या वाटचालीचे नेमके दर्शन या आत्मचरित्रातून होते. साधी, सोपी, ओघवती भाषा आणि वैज्ञानिक संज्ञांचे अवडंबर न माजवता, सहज आकल न होईल अशा प्रकारे केलेली मांडणी यांमुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे. विविध समित्यांवर त्यांनी केलेले काम, त्यांबाबत त्यांनी दिलेले अहवाल, निसर्ग-मानव सहजीवन आणि संघर्ष यातून झालेले लढे आदींचा सारा तपशीलही या पुस्तकात आहे; त्यामुळे त्याला संदर्भमूल्यही आहे.

वडील धनंजयराव गाडगीळ यांचा अभ्यासाचा आणि ज्ञानाचा समाजासाठी उपयोग करण्याचा वारसा माधव गाडगीळ यांनी कसा पुढे नेला, हे सांगण्यासाठी त्यांचे आजवरचे कार्य पुरेसे आहे. मात्र, या कार्यामागील त्यांची प्रेरणा आणि धारणा यांबद्दलची माहिती आत्मचरित्रातून उलगडते. पक्षिनिरीक्षणाची आणि वाचनाची आवड त्यांना लहानपणापासूनच लागली. घरात प्रचंड ग्रंथसंग्रह होता. अभंगांपासून आधुनिक कविता-कादंबऱ्यांपर्यंत, इतिहासाच्या निबंधांपासून समाजशास्त्रीय रचनांपर्यंत, अर्थशास्त्रापासून विज्ञानापर्यंत सर्व प्रकारचे साहित्य त्यांना वाचायला मिळाले. यामुळे शाळा-महाविद्यालयांत जे शिकविले जायचे, त्याच्या पलीकडे खूप समजावून घेता आले, असे गाडगीळ यांनी नमूद केले आहे. मानवशास्त्रातील तज्ज्ञ इरावती कर्वे त्यांच्या शेजारी राहायच्या. उत्खननासाठी, संशोधनासाठी त्या बाहेर जात. गाडगीळ




बेसुमार वृक्षतोड, बेफाम खाणकाम.
अनिर्बंध बांधकाम आणि अविचारी पाडकाम.
मानवाने निसर्गाची हत्या चालवली आहे.
पण निसर्गाची हत्या म्हणजे माणसाची आत्महत्या.
कशी, ते सांगत आहे...

मानवी अविवेकाचे अंतरंग
निसर्गकल्लोळ

अतुल देऊळगावकर

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

मराठी चौथीत असताना, त्यांना इरावतींबरोबर जाण्याची संधी मिळाली. महिनाभर शाळा बुडवून जाण्याची परवानगी घरच्यांनी दिली. पक्षितज्ज्ञ सालिम अली हे त्यांच्या वडिलांचे मित्र; त्यामुळे त्यांचाही सहवास मिळाला. गाडगीळ यांच्यातील अभ्यासक आणि संशोधक अशा प्रकारे विकसित होत गेला.

स्वत:ची गोष्ट सांगतानाच, गाडगीळ यांनी आपल्या अभ्यासाचा, संशोधनाचा विषय विषद करताना जंगलांबद्दल, देवरायांबद्दल, गवळी-धनगर-आदिवासी आदींबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल आणि विज्ञानाबद्दलही विस्ताराने लिहिले आहे. परदेशातून शिक्षण घेऊन पुण्यात परतल्यानंतर १९७१मध्ये वेताळ टेकडीवर फिरायला जाताना झाडांवरील कावळा, जंगल कावळा आणि मैना यांच्या सामूहिक रातनिवाऱ्याचे निरीक्षण त्यांनी सुरू केले. यातून त्यांनी केलेले संशोधन 'आयबिस'मध्ये प्रसिद्ध झाले. नियमित निरीक्षण आणि आकलन यांतून संशोधन कसे आकाराला येते, याचा वस्तुपाठच त्यांनी या उदाहरणातून दिला आहे. अशा प्रकारची अनेक उदाहरणे या पुस्तकात आहेत. पश्चिम घाटाबाबत त्यांच्या समितीचा अभ्यास, त्याचा अहवाल आणि नंतरचे राजकारण यांबद्दलही त्यांनी विस्ताराने लिहिले आहे. परिसर आणि पर्यावरण विज्ञान जाणण्यासाठी आणि गाडगीळ यांच्यासारख्या शास्त्रज्ञाची जडणघडण समजून घेण्यासाठी हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरते.

***श्रीधर लोणी***

(*महाराष्ट्र टाइम्स*, ४ फेब्रुवारी २०२४मधून साभार)


पद्मभूषण माधव गाडगीळ म्हणजे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व! केवळ निसर्गप्रेमी वा निसर्ग-अभ्यासकांनाच नव्हे, तर भवतालाबद्दल कुतूहल असणाऱ्या प्रत्येकाला एका वेगळ्या विविधरंगी जगाचे दर्शन घडवणारी त्यांची जीवनसफर.

सह्याचला आणि मी :
एक प्रेमकहाणी

माधव गाडगीळ

किंमत : ₹ ८००/- । (ट.ख. ₹ ५०)



## ‘राजहंसी’ विविधा



गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत, तसेच ‘दिगमा’ या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाला न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

### पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी, साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

### वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर



दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट. ख. ₹ १००)



ही कहाणी केवळ आकाशात भरारी घेणारा वैमानिक कायमसाठी चाकाच्या खुर्चीत जखडबंद होतो त्याची नाही, तर पुनश्च ‘राखेतून उगवतीकडे’ निग्रहाने झेपावतो, त्याची होय.

### राखेतून उगवतीकडे

विंग कमांडर अशोक लिमये

अनुवाद : सोनाली नवांगुळ

किंमत : ₹ ३२५/- । (ट.ख. ₹ ५०)

## राजहंसी पार

काय घडलं
'राजहंसी' नगरीत?

### 'पाषाणाचे पाझर' : प्रकाशन



डावीकडून : सतीश गोरे, सुलभा तेरणीकर, उमा गाडगीळ,
विवेक गाडगीळ, भारत सासणे, डॉ. सदानंद बोरसे,
अरुणा गायकवाड, स्वाती गाडगीळ, सुजाता गाडगीळ

'पाषाणाचे पाझर' या राजहंस प्रकाशन प्रकाशित व विवेक गाडगीळ लिखित आत्मचरित्रवजा प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी पुण्यातील 'राजलक्ष्मी सभागृह' येथे संपन्न झाला.

या प्रकाशन समारंभास राजहंस प्रकाशनाचे डॉ. सदानंद बोरसे, अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ लेखक भारत सासणे, पुस्तकाच्या संपादक सुलभा तेरणीकर, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

संगमनेरसारख्या अविकसित तालुक्याच्या ठिकाणाहून शालेय शिक्षण घेऊन पुढे अभियांत्रिकी शिक्षण घेतल्यावर उच्च पदावर उत्कृष्ट सेवा करताना हैदराबाद मेट्रोसह विविध प्रकल्पांच्या पूर्ततेत महत्त्वाची भूमिका पार पाडताना, श्री. विवेक गाडगीळ यांना अनेक अनुभव आले. अनेक परप्रांतीय लोकांशी नातेसंबंध जोडले गेले. त्यातूनच या पुस्तकाचा जन्म झाला. अत्यंत प्रामाणिकपणे आणि सहजसोप्या

भाषेत या पुस्तकाची मांडणी केली असल्यामुळे अनेकांना हे पुस्तक आवडेल, प्रेरणादायक ठरेल हे नक्की.

''दगड, माती, पोलाद यांच्या सान्निध्यात राहून काम करतानाही श्री. गाडगीळ यांनी संवेदनशीलता जपली आणि आपल्या अनुभवांना शब्दरूप दिले.'' असे मत राजहंस प्रकाशनाचे संपादक डॉ. सदानंद बोरसे यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे 'स्वत:चा शोध घेण्याची ऊर्मी, माणुसकीचे मूल्य न सोडता केलेले काम आणि काही गोष्टी न लिहिताही सूचित करण्याचे कौशल्य या गोष्टी असल्या की, प्रथितयश साहित्यिक नसूनही ती व्यक्ती उत्तम लिखाण करू शकते याचे उदाहरण म्हणजे विवेक गाडगीळ यांचे लेखन.' असे गौरवोद्गार श्री. भारत सासणे यांनी काढले.

''विविध क्षेत्रांतील लोकांनी केलेले असे लेखन हा इतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ऐवज असतो. आपल्या आयुष्यातल्या अशा आठवणी सामान्य माणसानेही लिहिल्या पाहिजेत.'' असे मनोगत श्री. विवेक गाडगीळ यांनी व्यक्त केले.

सतीश गोरे, अरुणा गुप्ते-गायकवाड, अरविंद गाडगीळ आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. उमा विवेक गाडगीळ यांनी केले.

❖


'राजहंस ग्रंथवेध' या नियतकालिकाची मालकी व इतर तपशिलासंबंधीचे निवेदन

फॉर्म नं. ४ (नियम ८ अन्वये)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०. |
| २. | प्रकाशन काळ | : मासिक |
| ३. | मालक, प्रकाशक | : सौ. रेखा दिलीप माजगावकर |
| | नागरिकत्व | : भारतीय |
| | पत्ता | : वरीलप्रमाणे |
| ४. | मुद्रक | : रिच प्रिंट्स |
| | नागरिकत्व | : भारतीय |
| | पत्ता | : २७२ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०. |
| ५. | संपादकाचे नाव | : डॉ. सदानंद बोरसे |
| | पत्ता | : बोरसे नर्सिंग होम, उजवी भुसारी कॉलनी, पौड रस्ता, कोथरूड, पुणे ४११ ०३८. |

मी, रेखा दिलीप माजगावकर असे जाहीर करते की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

***रेखा दिलीप माजगावकर***

दि. १५ मार्च २०२४ प्रकाशक



# वाचकांच्या मनातलं...

*वाचकांचा प्रतिसाद हाच लेखकाचा खरा पुरस्कार! हा प्रतिसाद मित्रांना कळवा, तसेच आम्हांलाही कळवा; म्हणजे तो आम्ही लेखकांपर्यंत पोहोचवू. प्रकाशक-लेखक-वाचक यांच्यात विचारांची देवघेव करण्यासाठी.*

## काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस'

नुकतेच डॉ. सुहास भास्कर जोशी यांचे 'काफ्काचं 'मेटॅमॉर्फोसिस' न संपणारं गारूड' हे पुस्तक वाचले. जगभरात प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकाचा अतिशय सुलभ असा अनुवाद डॉ. सुहास भास्कर जोशी यांनी केला आहे. हे पुस्तक चार विभागांत विभागलेले आहे. भाग एक - मेटॅमॉर्फोसिसचा अनुवाद. भाग दोन - श्रेष्ठ साहित्यिक फ्रांझ काफ्का. भाग तीन - आस्वादक विश्लेषण आणि भाग चार - मेटॅमॉर्फोसिसशी नाते सांगणाऱ्या साहित्यकृती. या विभागणीमुळे माझ्यासारख्या साधारण वाचकासाठी काफ्काची ही साहित्यकृती समजायला खूप मदत झाली आहे.

प्रत्यक्ष अनुवाद वाचताना वर म्हटल्याप्रमाणे सुलभ असल्यामुळे कुठेही कंटाळा आला नाही. या कादंबरीचे कथानक बहुतेक सुजाण वाचकांना ठाऊक असल्यामुळे त्याबद्दल मी लिहीत नाही. परंतु काफ्काच्या काळापासून म्हणजे सुमारे १२५ वर्षांपासून या कादंबरीत असलेल्या सामाजिक, राजकीय परिस्थितीत तसूभरही फरक झालेला नाही; याची मात्र जाणीव झाल्यावाचून राहत नाही.

दुसऱ्या भागात फ्रांझ काफ्काचा जीवनपट, लेखनकर्तृत्व यांबद्दल लिहिलेले असून काफ्काच्या वडलांचा हुकूमशाही आणि अतिमहत्त्वाकांक्षी स्वभावाचा काफ्काला किती त्रास झाला आणि याचा केवढा प्रचंड मानसिक ताण काफ्कावर होता हे समजते आणि तरीही संवेदनशील काफ्काच्या हातून जे सकस लेखन झाले, त्याचा अगदी पाच-सहा पानांत आढावा घेतला आहे. 'मेटॅमॉर्फोसिस' या कादंबरीच्या जन्माचा उलगडा या भागात आपल्याला होतो.

तिसऱ्या भागात डॉ. जोशींनी आस्वादक विश्लेषण सादर केले आहे. यात मेटॅमॉर्फोसिसची महानता, शीर्षकाचा अन्वयार्थ, प्रतीकात्मक विचार आणि तत्त्वज्ञान, व्यक्तिरेखा, लेखनशैली आणि वैशिष्ट्य तसेच विविध माध्यमांमधील अस्तित्व व

## ‘राजहंसी’ विविधा




फ्रांझ काफ्का हा विसाव्या शतकातील महत्त्वाचा लेखक. त्याचा जीवनपट आणि त्याचे लेखन, ‘मेटॅमॉर्फोसिस’चे आस्वादक विश्लेषण, त्याच्याशी नाते सांगणाऱ्या साहित्यकृतींचा परामर्श यांचा समावेश असलेले पुस्तक.

### काफ्काचं ‘मेटॅमॉर्फोसिस’

न संपणारं गारूड

डॉ. सुहास भास्कर जोशी

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. ₹ ५०)




कविकुलगुरू कालिदासाचे ‘मेघदूत’ हे खंडकाव्य म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार! कालिदासाच्या ‘मेघदूता’चा जणू ‘सीक्वेल’ म्हणजे या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

### मी सखा मेघदूत

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट. ख. ₹ ५०)




गुणवंत माणसांच्या परीसस्पर्शानं आपल्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं सोनं होतं!
स्वत:च्या झळाळत्या तेजानं बरोबरच्या आयुष्यांनाही लखलखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची तेजाळ शब्दचित्रं.

### चंदेरी - सोनेरी

विलास शेळके

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. ₹ ५०)

प्रभाव अशी मांडणी केली आहे. याचे कारण म्हणजे एवढ्या छोट्याशा पण वैश्विक सत्य सांगणाऱ्या या कादंबरीत काफ्काला काय सांगायचे आहे, कसे सांगायचे आहे, वाचकांवर त्यांचा होणारा परिणाम काय आहे याचा परामर्श घ्यायचा आहे व यांत डॉ. जोशी यशस्वी झाले आहेत.

चौथा विभाग 'मेटॅमॉर्फोसिसशी नातं सांगणाऱ्या कलाकृती' असा आहे. हा या पुस्तकाचा कळस आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यामध्ये हारुकी मुराकामीची 'सॅम्सा इन लव्ह' ही कथा, डेव्हिड गार्नेटची 'लेडी इन टू फॉक्स' ही कादंबरिका, इयान मॅक्युअनची 'द कॉक्रोच' ही कादंबरी, विलास सारंगांच्या काही कथा, आयनेस्कोचं 'रायनॉसोरस' हे नाटक , जी. ए. कुलकर्णींची 'स्वामी' ही कथा आणि वसंत आबाजी डहाके यांची 'फ्रांझ काफ्का, डिसेंबर १९६७' ही कविता - या सर्वांचे मेटॅमॉर्फोसिसशी असलेले नाते उलगडवून दाखवताना लेखकाने मूळ साहित्यकृतीचा इतर साहित्यकृतींवर असलेला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव विस्ताराने सांगितला आहे. त्यामुळे काफ्काच्या या कादंबरीचे गारूड न संपणारे आहे, हे लेखक पुस्तकाच्या शीर्षकात म्हणतो ते वास्तवाला धरून आहे, असेच म्हणावेसे वाटते.

वर मांडलेले हे सर्व मुद्दे केवळ १३५ पृष्ठांत सामावलेले असल्यामुळे, मी वर म्हटल्याप्रमाणे माझ्यासारख्या साधारण वाचकाला याचे ओझेही होत नाही. हा, जिज्ञासा मात्र हवी.

***संजय तांबे***

# मी सखा मेघदूत

हर्षदाताई, किती छान लिहीलंय तुम्ही!
काय म्हणू तुम्हाला?
U made my day ...
'एक दिवस असा येतो...
सारा मोहरा फिरून जातो...'

असं झालं माझं! काल मी 'मी सखा मेघदूत' वाचायला घेतलं... आणि अख्खा दिवस हरवून गेले! कितीतरी दिवसांनी हे घडलं!

तुम्ही संवाद... शब्दांतून साधताना, रामगिरी ते अलकानगरीपर्यंतचा प्रवास... आहाहा... 'सुहाना सफर और ये मौसम हंसी' असा होता. तिथले डोंगर, पर्वतरांगा, झाडं, फुलं, नद्या... इंद्रधनूचे रंग... गंध... रूप... स्पर्श - अगदी सगळी पंचमहाभूतं, पंचतन्मात्रा... या सगळ्यांशी आमचाही संवाद... तुमची वैखरी साधत होती!

हर्षदाताई, ... 'गीता' हा कृष्णार्जुनसंवाद आहे. समर्थांचा 'दासबोध' हा गुरुशिष्यसंवाद आहे. प्लेटो आणि सॉक्रेटिसचं जीवन हा एक संवादप्रवाह होता. स्वामी विवेकानंदांच्या एका संवादानं शिकागो धर्मपरिषद गाजली. रामकृष्ण परमहंस यांचं जीवन, हा अखंड परमार्थसंवादच होता... संवादात एक प्रकारची समक्षता असते, समीपता असते. संवादात असते ती अंतरंगांची उकल... मन मोकळं करणं... सर्वांगीण समरसता हेच संवादाचं सार... जे तुम्ही साधलं आहे!

आणि या सुंदर पुस्तकातून तुम्ही 'जीवनदर्शन' घडवलं आहे! निर्मळ स्नेह, प्रांजळ विचार, उत्कट अभिव्यक्ती आणि निरलस विचारविनिमय... अशा गुणसंपदेची मैफील म्हणजे संवाद... अशी मैफील सजवली आहे तुम्ही या पुस्तकातून! पुस्तकाचं नामाभिधान... किती सांगू? 'मी सखा'... आहाहा! यामध्येही केवढं काव्य आहे, अर्थपूर्णता आहे, अध्यात्म आहे! आणि 'मेघदूत' हा केवळ शब्द नाही, केवळ काव्य नाही; तर ती 'परावाणी' आहे... ती अंत:करणात वसलेली, नाजूक भावनांची, प्रणयाराधनाची, उत्कट प्रेमाची, लक्ष्मीवंत, वरदवंत असलेली मोहक नगरी आहे!

म्हणूनच साहित्य आणि कुंचला यांच्या सहयोगातून सिद्ध झालेला हा साहित्यसंकल्प सुंदर झाला आहे! सारस्वतांच्या गुंफेमध्ये चिरंतन राहावं असं हे साहित्यलेणं आहे... याचं वर्णन (अजून खूप खूप मनात उद्भवतं आहे... बोलावंसं... लिहिलंस वाटतंय.), पण या साहित्यलेण्याचं लावण्य वर्णन करायला माझ्याजवळ शब्दलावण्य नाही, या जाणिवेनं थांबते!

तरीही एक बोलतेच... या पुस्तकात सगळीकडे पसरली आहे ती सकारात्मकतेची हिरवळ... मऊ.. मृदू.. मुलायम! आशेच्या बकूळफुलांचा गंध... आणि विशेष म्हणजे अध्यात्माचा, परतत्त्वाचा संजीवक स्पर्श!





ही कथा आहे सत्तरीच्या दशकातील तरुणीची.
ओढाळ तरुण वयात मोहाच्या एका धूसर क्षणी
अपघातानं ती एक चूक करते.
पण त्यापायी तिचं सारं आयुष्यच बदलून जातं.
यातून सुटण्याचा मार्ग तिला सापडतो का?
परतीची वाट सापडते का?

डोईचा पदर आला खांद्यावरी...

डॉ. छाया महाजन

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. ₹ ५०)

त्यामुळे तुमच्या या सहजसुंदर अभिव्यक्तीस, नकळत वाग्यज्ञाचं ऐश्वर्य प्राप्त झालं आहे! तुमचं अखेरचं पसायदान तर अप्रतिम साधलं आहे. त्याला कहाणीचा गोडवा आहे, मोगऱ्याच्या फुलांचा सुवास आहे, खडीसाखरेची गोडी आहे, भाषेला श्रीकृष्णाच्या बासरीचे सुरेल सूर, लय, ताल आहे!

म्हणूनच हा वाग्यज्ञ सफळ संपूर्ण झाला आहे!

(आता थांबणंच भाग आहे... म्हणूनच थांबते...)

हर्षदाताई..! मनापासून अभिनंदन आणि आभाळभरून शुभेच्छा!

***सौ. सुहास ढेकणे, पुणे***

## ‘वाणी आणि लेखणी’ व ‘पत्र आणि मैत्र’

आदरणीय दिलीप सर,

‘वाणी आणि लेखणी’ व ‘पत्र आणि मैत्र’ या ग्रंथांचे वाचन म्हणजे साहित्य-संस्कृतीशी जीवाचे नाते सांधलेल्या दिग्गजांशी संवाद साधण्यासारखे आहे, असे मला या काळात सतत जाणवत राहिले. सर, हे ग्रंथ जरी आपल्या अनुभवातून, वाणीतून, लिखाणातून प्रकाशित झाले असले, तरी हा एका साहित्यसंस्कृतीशी प्रामाणिक असलेल्या पिढीचा दस्तऐवज आहे, जो आम्ही जपून ठेवायला हवा.

आपण माझ्यासारख्या अगदीच अलीकडच्या युवकासह इतके मैत्रीपूर्ण नाते निर्माण होऊ दिलेत, तेव्हा या आपल्या समांतर आणि आपल्याला ज्येष्ठ असणाऱ्या पिढीसोबत असलेली मैत्री ही किती सहज आणि खरी असेल, याचा अंदाज मला पुस्तके वाचताना येत गेला. ‘कशी एकाच काळात अशी ग्रेट माणसं होऊन गेली? कशी ती नेमकी एकमेकांना भेटली? कशी त्यांच्यातच मैत्री झाली?’ असे कुतूहल म्हणून मला प्रश्न पडत गेले. मला मुद्दामहून आपल्या पत्रांचा आणि व्याख्यानांचा उल्लेख करायचा आहे. मी आपल्याला पाहिल्या-ऐकल्यामुळे असेल, मला सतत ती वाचताना आपण सोबत आहात, बोलत आहात असा भास होत राहायचा. भाषणे जरी लिखित स्वरूपात असली, तरी आपली मुद्द्याशी जोडले राहून, मुक्त संवाद साधण्याची शैली मला खूप काही शिकवून गेली. त्यात प्रकाशक संघासमोर आपण केलेले भाषण, म्हणजे खरोखर ‘ ‘राजहंस’ ही संस्था आज या आदरणीय स्तरावर का?’ याचे उत्तर आहे! लेखांमध्ये ‘अत्रे असताना-नसताना’मध्ये आपण आचार्यांविषयी व्यक्त केलेली भावना मनाला भिडली, ‘प्रिय तें’ अशी सुरुवात करून तेंडुलकरांविषयी लिहिताना आपली लेखणी जिव्हाळ्याची झाली. सई परांजपे, मंगेश पाडगावकर आणि अनेकांनी आपल्याविषयी जे लिहिले, ते वाचताना आपण ‘कुणासोबत’ वावरतोय याचे किंचित

## खास बालवाचकांसाठी लिहिलेली 'राजहंसी' पुस्तके



शाळा ते घर, घर ते शाळा...
यांखेरीज कवितेच्या, पशुपक्ष्यांच्या जगाची
ओळख करून देणारी व मुलांच्या
कल्पनाशक्तीला चालना देणारी पुस्तकं!



मागवा खालीलपैकी १ पुस्तक किंवा ३ पुस्तके - ट.ख. ५०/-




### बहिणाबाई चौधरी

माधवी भट

किंमत : ₹ ५०/-

### बिट्टूची सूर्यसहल

कविता भालेराव

किंमत : ₹ ५०/-







### शेपटीच्या गोष्टी

सुरेशचंद्र वारघडे

किंमत : ₹ ६०/-

सकारात्मक दडपण माझ्या मनावर येत गेले.

सर, हे दोन्ही ग्रंथ अगदी योग्य काळात माझ्या पिढीच्या हाती आले आहेत. ते या नव-सारस्वतांच्या मातीत रुजतील आणि ताज्या दमाचे शब्द-वारकरी यातून निर्माण होतील, अशी आशा मनाला वाटते. थेट जाऊन बोलणारी, भिडणारी मैत्री केवळ लौकिकाच्या पातळीला न राहू देणारी आपली पिढी होती; आपण तसे आहात, आज आम्हाला ती अक्षर-मैत्री तशी फारशी गवसत नाही (कदाचित ती माझी स्वत:ची मर्यादा असेल), पण तरीही आपला स्नेहपूर्ण सहवास मला लाभत आहे, त्याकरिता मी स्वत:ला भाग्यशाली समजतो! या कृतज्ञतेच्या उल्लेखाची पुनरावृत्ती जरी माझ्या दर पत्रात, भेटीत होत असली; तरी त्यामागची भावना प्रामाणिक आहे हे आपण समजून घ्याल असा विश्वास वाटतो.

बाकी या ग्रंथांची घडण, बांधणी ही निगुतीने केलेली डोळ्यांना, स्पर्शाला जाणवते. 'राजहंस'च्या संपूर्ण टीमचे आपल्याप्रती असणारे प्रेम आणि कृतज्ञता त्यातून भरभरून व्यक्त झालेली दिसते. या ग्रंथावर माझे नाव लिहून आपण दिलेली आपली स्वाक्षरी त्यावर उमटली आहे, त्यामुळे या आपल्या मित्रांच्या आदरणीय गोतावळ्यात या सगळ्यात ज्युनिअर धडपड्या मित्राचाही अदृश्य उल्लेख आहे, असेच मी समजतो आणि सुखावतो.

धन्यवाद!

आपला,<br>
***आदित्य दवणे***

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांवरील पुस्तकांविषयी**

- बंदिवान — किंमत : ₹ ५२५/-<br>एमा डोनाह्यू<br>अनुवाद : वसुधा जोशी
- तंत्र-मुक्ती — किंमत : ₹ ४२५/-<br>दिलीप कुलकर्णी
- काळोखातून उजेडाकडे — किंमत : ₹ १६०/-<br>लक्ष्मण कृष्णाजी पानसरे
- सो कुल.. टेक २ — किंमत : ₹ ३५०/-<br>सोनाली कुलकर्णी

राजहंस प्रकाशन




**'राजहंसी' डिजिटल ॲपवरून तुम्ही काय काय करू शकता?**

- पुस्तकाची छापील प्रत ऑर्डर करू शकता / ई-पुस्तक ऑर्डर करू शकता. विकत घेतलेली ई-पुस्तके वाचू शकता.
- राजहंसच्या बुक क्लबचे सदस्य होऊ शकता; बुक क्लबचे फायदे घेऊन पुस्तके ऑर्डर करू शकता.
- राजहंस प्रकाशन या ॲप्लिकेशनमध्ये (फक्त Android App वर) एक नवीन कल्पनादेखील राबवणार आहे. यात आपण महिन्याचे / वर्षाचे पुस्तकालयाचे पैसे भरू शकता आणि महिनाभर / वर्षभर राजहंसची कोणतीही उपलब्ध असलेली ई-पुस्तके वाचू शकता. एका वेळेस एक पुस्तक या योजनेद्वारे वाचता येईल.
- आपणास ई-पुस्तक विकत घ्यायचे नसल्यास, राजहंस प्रकाशनाची ई-पुस्तके आपण नाममात्र भाडे भरून काही दिवसांसाठीदेखील वाचनासाठी घेऊ शकता. आपल्या आवडत्या व्यक्तीस आपण पुस्तक भेट देऊ शकता.
- राजहंस प्रकाशनाच्या नवीन उपक्रमांसंबंधी माहिती ॲपद्वारे आपल्यास मिळू शकते.
- राजहंस प्रकाशनाच्या लेखकांसंबंधी माहिती, त्यांना आवडलेल्या पुस्तकांबद्दल त्यांची मते, त्यांचे व्हिडिओ आणि बरेच काही...
- आणि हो, आपणपण पुस्तकांबद्दल आपले अभिप्राय ॲपद्वारे आम्हास पाठवू शकता.

GET IT ON Google Play

**अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी**

Download on the App Store


**आयफोन आणि आयपॅडसाठी**

आधुनिक तंत्रांचं विविध निकषांवर
कठोर परीक्षण करून
त्यांची घातकता दाखवून देणारं हे पुस्तक :
'समुचित' तंत्रांच्या संयमित वापराकडे जाण्याची
आवश्यकता प्रतिपादन करणारं...




तंत्र-मुक्ती
दिलीप कुलकर्णी

इंजिनीयर होण्याची महत्त्वाकांक्षा
पुरी करण्याची जिद्द.
तत्त्वांशी तडजोड न करण्याची सचोटी.
मिंधेपणा अव्हेरणारा स्वाभिमान.
या बळावरच त्यांनी लढा दिला
व्यवस्थेतील भ्रष्ट मानसिकतेविरुद्ध.
आजही ही लढाई सुरूच आहे.
आपल्या सहप्रवाशांच्या सहकार्याने ही भ्रष्ट
मानसिकता कधी ना कधी नष्ट होईल,
असा आशावाद जागवणारे आत्मकथन.




काळोखातून उजेडाकडे
लक्ष्मण कृष्णाजी पानसरे

Registered
Rajhans Granthavedh
(REGD.NO. : PCW / 133 / 2022-2024 RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
Published on 15th of every month and posted on 20th of every month at S.P.COLLEGE PO,Pune)
Licence to post without Pre-payment No. - WPP-48

सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री.
सोनाली उघड्या डोळ्यांनी जग पाहताना
माणसांना वाचते आणि शब्दांतून
त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते.
अशा संवेदनशील आणि संवादोत्सुक अभिनेत्रीला
रंगभूमीवर आणि पडद्यावर
पाहण्या-ऐकण्याएवढंच
'वाचणं'ही किती लोभस असू शकतं,
याचं उदाहरण म्हणजे...




सोकुल.. टेक २
सोनाली कुलकर्णी

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा : राजहंस प्रकाशन.** १०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन : २४४७३४५९

**सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे**